
प्रकरण तिसरे

# पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णनातील अभिव्यक्तीसौंदर्य



## प्रकरण ३ रे

# पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णनातील अभिव्यक्तिसौंदर्य

### अ) प्रवासवर्णनातील पु. लं. चे व्यक्तिमत्व

स्वातंत्र्योत्तर कालखंडामध्ये मराठी वाङमयाच्या सर्वच क्षेत्रात नवनवीन प्रयोग करण्यात येऊ लागले. पारंपारिक वाङमय प्रकारांना प्रयोगशीलतेचे अनेक घुमारे फुटले. विशेषतः ललितनिबंधासारखा स्वैर वाङमय प्रकार विविध अंगाने फुलत राहिला विकसित होत राहिला. अशा कालखंडात पु. लं. नी आपल्या प्रतिभेनुसार कथा, व्यक्तिचित्रे, नाटके, प्रवासवर्णने असे विविध वाङमय प्रकार हाताळले हे हाताळताना त्यांनी त्या त्या वाङमय प्रकाराचा विशिष्ट ढाचा कधीच वापरला नाही. आपल्याला सुचेल त्या विषयावर ते मुक्तपणे लिहित राहिले. असे असले तरी या सर्वच लेखनाच्या पाठींशी दोन महत्वाची तत्वे आपल्याला दिसून येतात. ती म्हणजे. १) त्यांच्या सर्वच लेखनाच्या पाठींशी विनोदवृत्ती असल्याने विनोदाच्या माध्यमातून त्यांनी चित्रण केले आहे. २) त्यांच्या सर्वच वाङमय प्रकाराच्या पाठींशी त्यांचे व्यक्तिमत्व उभे आहे. त्यांच्या विशिष्ट व्यन्तिमत्वाच्या आविष्कार त्यांच्या सर्वच लेखन प्रकारांतून झाला आहे. म्हणजेच विनोदवृत्ती व व्यक्तिमत्वाचा आविष्कार ही त्यांच्या एकूण वाङमयाची महत्वाचे दोन वैशिष्ट्ये होत. त्याची प्रवासवर्णने ही सुध्दा त्याला अपवाद नाहीत.

पु. लं. चे व्यक्तिमत्व संपन्न आहे. अनेक विविध गुणांचे त्यांच्या व्यक्तिमत्वात मिश्रण झाले आहे. प्रवासवर्णन हा वाङमय प्रकार ललित लेखनाचाच एक प्रकार आहे आणि ललित लेखनात प्रामुख्याने लेखकांमधील 'मी' या व्याक्तिमत्वाचा आविष्कार असतो. डॉ. वसंत सावंत यांनी म्हटल्याप्रमाणे, "प्रवासवर्णन हा एक वाङमय प्रकार असा आहे की ज्या लेखकाच्या सर्वकष बहुरंगीय व्यक्तित्वाचे अनेक पदर व्यक्त व्हायला खूपच वाव मिळतो आणि लेखकाच्या व्यक्तिमत्वाची व्याप्ती कळायला खूप मदत होते. इतके लौकीक जीवनाशी संबंधित असे खाजगी जीवन त्याच्या आवडी निवडी सवयी, रसिकता, बहुश्रुतता इत्यादी स्वभावाचे विविध पैलू प्रवासवर्णनात व्यक्त होतात. त्यामुळे त्या लेखनाची रंगत व ललित्य वाढते". [१] प्रवासवर्णन : एक वाङमय प्रकार लेखकाच्या व्यक्तिमत्वामूळे प्रवासवर्णनाला वाङमय रुप प्राप्त होते. कारण प्रवासवर्णनात एखाद्या

परदेशातील इतिहासाचे व भूगोलाचे वर्णन असते. परंतू त्यातून व्यक्त होणाऱ्या लेखकाच्या व्यक्तिमत्वामूळे त्या लेखनात ललित्य निर्माण होते. म्हणून डॉ. वसंत सावंत यांनी म्हटले आहे, "प्रवासवर्णनातील लेखकाचे व्यक्तिमत्व आणि त्या व्यक्तिमत्वाचा लौकिकाच्या पातळीवरील विविध तऱ्हांनी होणारा आविष्कार, प्रवासवर्णनाला 'वाङमय प्रकार म्हणून खास आगळा आकार देतो. यात संशय राहत नाही. लेखकाच्या व्यक्तिमत्वावर अधारित असणे हा या वाङमय प्रकाराचा प्राणभूत घटक आहे. या लेखकाशिवाय 'प्रवासवर्णनाची' निर्मिती होणे, त्याला त्याचा असा म्हणून 'एक घाट' किंवा 'आकृतीबंध' किंवा 'रुप' जाणणे शक्य होणार नाही."[२]

त्यामूळे पु. ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या दोन्ही वाङमय प्रकारांत त्यांच्या व्यक्तिमत्वाचे अनेक गुणविशेष प्रकट झालेले आहेत. इतर वाङमय प्रकारांत त्यांचे इतर काही गुणविशेष दिसत असले तरी या लघुप्रबंधात त्यांच्या प्रवासवर्णनातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे जे गुणविशेष दिसून येतात. त्यांचाच परामर्श घेणे योग्य ठरेल म्हणून समग्र साहित्यातून त्यांच्या व्यक्तित्वाची गुणवैशिष्ट्ये दिसून येतात त्यांचा विचार न करता फक्त प्रवासवर्णनपर लेखनातून त्यांच्या व्यक्तिमत्वाचे कोणते विशेष दिसून येतात. त्याचा परामर्श घेण्याचा प्रयत्न केला आहे.

### १) विनोदवृत्ती

पु. ल. देशपांडे यांच्या व्यक्तित्वाचा एक महनीय विशेष म्हणजे त्यांची विनोदवृत्ती. भोवतालच्या जीवनाकडे, समाजाकडे, माणसांकडे, ते विनोदवृत्तीने पाहतात. त्यामूळे त्यांच्या सर्वच प्रकारच्या लेखनातून प्रामुख्याने विनोदाचा आविष्कार झाला आहे. एक विनोदी लेखक अशी त्यांची ख्याती आहे. त्यामूळे 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या त्यांच्या दोन्ही प्रवासवर्णनात त्यांच्या विनोदवृत्तीचा आविष्कार झालेला दिसून येतो. किंबहूना त्यांची ही दोन्ही प्रवासवर्णने लोकप्रिय झाली. त्याचे कारण त्यातील विनोद होय. प्रवासाच्या निमित्ताने आपल्याला आलेल्या विविध अनुभवांचे, मनात उमटलेल्या विचारांचे, भावनांचे, कल्पनांचे त्यांनी विनोदाच्या माध्यमातून आविष्कर केले आहे. विनोदाचे सर्वच प्रकार त्याच्या या लेखनातून कमी जास्त प्रमाणात जाणवत असले तरी पु. लं. ची प्रतिभा शब्दनिष्ठ व स्वभावनिष्ठ विनोदात अधिक रमलेली दिसते. विशेषतः विशिष्ट प्रकारच्या शब्दांचा उपयोग करुन कोट्या करण्याकडे त्याचा अधिक कल दिसतो. याच प्रकरणातील पु. ल. च्या प्रवासवर्णनातील विनोद याच मुद्द्याच्या विवेचनात परामर्श घेतला आहे.

(पृ. ९२ ते १००) परंतू त्यांनी विनोदाचा आविष्कार केवळ मनोरंजनासाठी केला नाही. त्या पाठीशी एक मूल्यनिष्ठा आहे. विनोदातून मानवी जीवनातील व स्वभावातील दोष दाखवावे विसंगती दाखवावी. यासारख्या प्रबोधनाचा विचारही त्या पाठीशी आहे. डॉ. भालचंद्र फडके यांनी म्हटल्याप्रमाणे, ''माणसाच्या जगात वावरताना त्यांना संगतीचा शोध लागतो आणि विसंगतीची जाणीव होते.... श्रीपाद कृष्णातप्रमाणे व्यंगदर्शन आणि व्यंग निर्मूलन हे पु. लं. च्या विनोदी लेखनामागे हेतू असावे.... पु. लं. ना जे उपहास विषयक गवसले ते अवतीभवतीच्या जीवनात आणि साहित्यक्षेत्रात, त्यामुळे ज्यांना 'मध्यमवर्ग' वा 'साहित्यक्षेत्र' परिचित आहे ते पु. लं. चे लेखन आस्वादू शकतात. विनोदनिर्मितीसाठी पु. लं. नी कोटी, उपरोध, उपहास, टवाळी व्याजोक्ती, वक्रोक्ती ऊनोक्ती इ. सर्व आयुधे सामर्थ्यानिशी वापरली आहेत. ते आपल्या विनोदी लेखनासंबंधी म्हणतात, 'नैराश्याचा अंधकार नाहिसा करणं, उदासीनतेची कोळीष्टकं झटकून टाकून ढोंगाचा फुगा फोडणं, दुःखाश्रू पुसणं हे माझ्या विनोदाचं प्रयोजन आहे. ज्याच्यावर शस्त्र चालवीत त्याची चांगली गुळगुळीत करीत पण त्याला कुठेही जखम होऊ न देता.'' त्यांचे लेखन या भूमिकेतूनच झाले आहे.''[३]

विनोद साधताना काही वेळेला मराठी शब्दांचा वाक्प्रचारांचा, म्हणींचा तर काही वेळेला कोकणी, संस्कृत इंग्रजी, जपानी शब्दांचा त्यांनी वैशिष्ट्यपूर्ण उपयोग केलेला दिसून येतो. त्यावरुन त्याच्या ठायी असलेल्या शब्दप्रभूत्वाची साक्ष पटते. त्याचबरोबर मानवी स्वभावाचे सूक्ष्म निरीक्षण करण्याची प्रवृत्तीही दिसून येते. विशेष म्हणजे या दोन्ही पुस्तकांत त्यांनी आपल्या स्वभावावर मधून मधून आपल्या स्वभावावर शारिरीक दोषांतवर मल्लिनाथी केली आहे. म्हणून त्यांच्या विनोदाचा गौरव करताना डॉ. वसंत सावंत यांनी म्हटले आहे, ''या पुस्तकात विनोदकार पु. ल. देशपांडे यांचे दर्शन हा त्यांचा खास पैलू, 'अपूर्वाई'ची अपूर्वाई अनेक अंगांनी वाढवतो. त्यासाठी लागणरी सूक्ष्म निरीक्षणशक्ती, सहृदय अंतःकरण, माणुसकीची अंतःकरणतील ऊब, प्रसंगी स्वतःला हसण्याची वृत्ती, विसंगती टिपण्याचे कसब, इंग्रजी, मराठी, संस्कृत, हिंदी भाषांचे ज्ञान, जीवनासक्ती हे सर्व गुण एकजीव होऊन येतात. आणि पु. ल. देशपांडे आपली प्रवासचित्रे व प्रवासातील असंख्य क्षण अमर करुन टाकतात. प्रसंगी हा विनोद उपहास व कोटी यांचाही आश्रय घेऊन अवतरलेला दिसेल. पाश्चात्य जीवन, संस्कृती, धर्म, राजकारण, समाजकारण व पौर्वात्य विशेषतः भारतीय

मराठी संस्कृती, धर्म, जीवन, राजकारण, समाजकारण यांतली द्वंद्वावर व विसंगतीवर आधारित विनोदाची कारंजी या प्रवासवर्णनात जागोजाग निर्माण झाली आहेत.''[४]

त्यांची ही दोन्ही प्रवासवर्णने वाचकांना व समीक्षकांना आवडली आणि ती लोकप्रिय झाली. याचे प्रमुख कारण म्हणजे त्यातील विनोद होय. प्रवासवर्णन सारख्या ललित लेखनात विनोदाचा इतका समर्पक व समर्थ आविष्कार इतर कोणत्याही लेखकाने केलेला नाही.

### २) कलाप्रेमी रसिक

पु. लं. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या दोन्ही प्रवास वर्णनपर लेखनातून एक विशेष जाणवतो तो म्हणजे त्यांचे मराठी नाट्य आणि संगीत यावर अलोट प्रेम आहे. डॉ. वसंत सावंत यांनी या संदर्भात त्यांच्या नाट्य पंढरीचा वारकरी आणि स्वरवेडे आणि संगीतकार या शब्दांत उल्लेख केला आहे. पु. ल. देशपांडे यांच्यावर मराठी नाट्यवाङमयाचे, संगीत नाटकांचे अनेक संस्कार झाले आहेत. नाट्य व संगीत याच्या विषयी त्यांना कमालीची आत्मियता आहे. त्यामुळे प्रवासवर्णन सारख्या लेखनातही त्यांच्या नाट्यप्रेमाचे, संगीत प्रेमाचे सूर उमटले आहे. या लेखनात त्यांनी प्रवास अनुभवांचे चित्रण करताना मराठी नाटकातील पात्रांचा, नाट्यसंगीताचा अनेक ठिकाणी कलात्मक उपयोग केला आहे. इतकेच नव्हे तर 'अपूर्वाई' मध्ये पाश्चात्य देशाचा प्रवास करताना आणि 'पूर्वरंग' मध्ये पूर्वेकडील देशाचा प्रवास करताना त्यांनी त्या त्या प्रदेशातील नाट्यप्रयोग, नृत्य व संगीत अशा कार्यक्रमाचा आस्वाद घेताना आलेल्या अनुभवांचे त्यांनी रसभरीत वर्णन केले. जेथे नाट्य आहे, नृत्य आहे, संगीत आहे तेथे ते रमतात इतकेच नव्हे तर ते मनस्वी पणे रमतात आणि त्या प्रसंगाचे त्यांनी या दोन्ही पुस्तकांतून रसभरीत वर्णन केले आहे. पाश्चात्य देशातील पिटलॉक्री येथे नाटक पाहताना आलेले अनुभवाचे वर्णन (अपूर्वाई पृ. ९१, ९२ ) स्कॉटलंड मध्ये 'बॅगपाईप' या वाद्याचे संगीत ऐकताना (अपूर्वाई पृ. ९७) इंग्लंड मध्ये इंग्रजी नाटके पाहताना आलेला अनुभव (अपूर्वाई पृ. १६२ ते १६५) शेक्सपिअरच्या गावी नाटके पाहताना आलेला अनुभव (अपूर्वाई पृ. १७० ते १७५) यहुदी मेनुहिन व्हायोलिन ऐकताना आलेला अनुभव (अपूर्वाई पृ. १८५ ते १८६) 'पूर्वरंग'मध्ये मलाया, इंडोनेशिया येथे पौराणिक नाटके पाहताना आलेला अनुभव (पूर्वरंग पृ. ७०) जकातीमध्ये नाट्य, नृत्य संगीत यांचा कार्यक्रम

पाहताना (पूर्वरंग पृ. ८० ते ८५) बाली बेटावर असेच संगीत नाटक पाहताना आलेले अनुभव (पूर्वरंग पृ. १०४ ते १०८) बॅकॉक संगीत शाळेला भेट दिली. आलेला अनुभव (पूर्वरंग पृ. १४० ते १४७) जपानमध्ये हॉटेलस मधून चालणारी संगीत नृत्ये यांची केलेली वर्णने (पूर्वरंग पृ. २२६ ते २३०) पाहताना त्याचे नाट्यप्रेम व संगीतप्रेम दिसून येते. अर्थात आधुनिक नाटके, आधुनिक संगीत यापेक्षा पारंपारिक असणाऱ्या नाटकांवर व संगीतावर त्यांचे अधिक प्रेम आहे. आधुनिक नाटके व आधुनिक संगीत या विषयी त्यांना फारसे आकर्षण वाटत नाही.

एवढेच नव्हे तर आपल्या प्रवासातील विविध अनुभवाचे वर्णन करताना त्यांनी नाटकांची आणि संगीताची परिभाषा वापरली आहे. याची चर्चा याच प्रकरणातील भाषाशैली व निवेदन शैली या मुद्द्याची चर्चा करताना उदाहरणे दिली आहे.

या उलट असे दिसून येते की, ऐतिहासिक वस्तूंचे म्युझियम पाहताना, चित्रकलेची प्रदर्शने पाहताना ते समरस होत नाहीत. अशा प्रसंगाचे चित्रण करताना त्याच्या लेखनात टीकेचा सूर अधिक जाणवतो.

### ३) माणूसप्रिय कलावंत

पु. ल. देशपांडे यांच्या या दोन्ही प्रवासवर्णनांतून माणसांवरील त्यांच्या प्रेमाचा प्रत्यय येतो. दोन्ही पुस्तकांत अनेक ठिकाणी त्यांनी स्पष्टपणेच उल्लेख केला आहे. की मला माणसे फार आवडतात. त्या दृष्टीने त्यांची खालील वाक्ये महत्वाची वाटतात.

१) ''मला पाहयला आवडतात माणसे! सकाळी उठून पर्वतीला फिरायला जाणारी माणसे... माणसाने माणूस पाहावा! तरुण पहावा, म्हातारा पाहावा, सुरुप पाहावा, कुरुप पाहावा पुष्कळदा वाटते की, जीवनाविषयीचे चिंतन माणसांच्या गर्दीत होते तसे एकांतात होत नाही.'' '५'

२) जीवंत माणसाइतके जगात पाहण्यासारखे काय आहे? प्रत्येक पुरुष आणि स्त्री ही प्रेक्षणीय वस्तू आहे. हर गार्डाची न्यारी शिट्टी, हर ड्रायव्हरचा न्यारा हात! नविनाच्या फलाटावर आपल्याला घेऊन जाणारी जी अटळ गाडी येईपर्यंत न कंटाळता प्रेमाने उभे राहण्याची धमक मात्र हवी! '६'

या दोन्ही विधनांतून त्यांचे माणूसप्रेम दिसून येते. त्यामुळे लंडनच्या प्रवासाला जाताना अनेक मित्र व नातेवाईक निरोप देण्यासाठी आले, त्या प्रसंगाने ते गलबलून गेले आणि आनंदून गेले. म्हणून त्यांनी म्हटले आहे,"दोस्त ही माझ्या आयुष्यातली अपूर्व कमाई आहे. दोस्तीच्या हिशोबात मी कदाचित बिर्लापेक्षा ही श्रीमंत असेन".'७' त्यांची ही मित्र प्रेमाबद्दलची पावती अर्थपूर्ण आहे.

या दोन्ही प्रवासात स्थळे पाहण्यापेक्षा त्या त्या प्रदेशातील माणसे, त्यांचा स्वभाव, त्यांचे वागणे, बोलणे पाहण्यात ते अधिक रममाण झालेले दिसतात. त्यामुळे दोन्ही प्रवासवर्णनात शेकडो लहान मोठ्या माणसांची त्यांनी शब्दचित्रे मार्मिकपणे रेखाटली आहेत. ती खालील प्रमाणे...

अपूर्वाई

१) विलायतला जाणाऱ्या लोकांचे कपडे शिवणारा शिंपी व चांभार.

२) विमानतळावरील कार्यालयातील कर्मचारी.

३) दवाखान्यातील डॉक्टर व नर्स.

४) कस्टम खात्यातील अधिकारी.

५) विमानातील हवाई सुंदरी.

६) लंडन मधील बॉबी.

७) लंडनमधील बागेत दिसलेली प्रणय जोडपे.

८) इंग्रज नवरा.

९) लंडनमध्ये भेटलेली घर मालकीण.

१०) पिटलॉक्री मधील हॉटेल मालक.

११) एडिंबरातील चित्र प्रदर्शनात भेटलेला रसिक.

१२) स्कॉटलंडमध्ये भेटलेला नाट्यकलावंत रदरफोर्ड.

१३) कार्लाइलच्या घरात भेटलेली म्हातारी.

१४) ऑक्सफर्डच्या विद्यापीठातील प्रोफेसर राईल.

१५) ब्रिटिश रंगभूमिवरील नाट्यकलावंत सर राल्फ रिचर्डसन.

१६) संगीताने मंत्रमुग्ध करणारा यहुदी मेनुहिन.

त्याच प्रमाणे पूर्वरंगातील.

१) 'पारव्यासारखे मधुचंद्राला निघालेले बोटीवरील जोडपे'.

२) बोटीवरचा मुख्य स्टुअर्ड.

३) जकार्तातले मणिकभाई.

४) राजदूत श्री. अप्पासाहेब पंत.

५) बाली बेटावरील गाईड 'मुख'.

६) गायन शाळेतील मास्तरीण.

७) लुटूलुट पळणारा भररस्त्यातील मुलगा.

८) रोशनलाल.

९) प्रा. दोही.

१०) नृत्याचार्य सकाकी बारा.

अशा चित्रणातून त्यांना माणसांची किती ओढ आहे हे दिसून येतो. माणसाच्या स्वभावाचे ते सूक्ष्म निरीक्षण करतात. ज्या माणसामध्ये काही चांगले गुण आहेत. ते शब्दांनी टिपतात. पण त्याच बरोबर माणसांमध्ये त्यांना जेव्हा दोष दिसतात. तेंव्हा ते शब्दांच्या शस्त्राने त्या स्वभावावर प्रहार करतात. अशा माणसाची उपहासपूर्ण चित्रे रेखाटतात. पण एकंदरीत त्यांचे माणसांवर प्रेम आहे. त्यांना माणूस आवडतो.

माणसांइतकेच किंबहूना माणसांपेक्षा त्यांना लहान बालके अधिक आवडतात की काय असे वाटण्याइतपत त्यांनी बालकांचे वर्णन केले आहे. इंग्लंडमध्ये लहान मुलांसाठी असणारी नाटके ते पाहायला जातात. 'सिंडरेला' हे लहान मुलांसाठी असलेले नाटक पाहाताना आपण किती प्रभावीत झालो हे सांगताना त्यांनी म्हटले आहे, ''रंगभूमीवर त्या प्रचंड भोपळ्यातून बारा पांढऱ्या शुभ्र जिवंत घोड्यांचा नक्षत्रांच्या टिकल्यांनी झगमगणारा रथ निघाल्यावर त्या पोरांच्याहून पोर होऊन मी देखील केव्हा टाळ्या पिटू लागलो हे मला कळले नाही.... तो बाळगोपाळांचा मेळावा पाहाताना मन उचंबळून येई. 'मुले ही राष्ट्राची संपत्ती आहे' ही घोषणा फक्त आम्हांला देता येते. पाश्चात्य देशांत ही संपत्ती हिऱ्यामोत्यासारखी जपण्यात येते. ती अशी एकत्रीत आढळली की जवाहिरखाना खुलल्यासारखी दिसते'' '८' लंडनमधील नाताळच्या सणात सांता क्लॉज हा लहान मुलांची कशी करमणूक करतो. याचे त्यांनी ('अपूर्वाई' पृ. १८९ )वर केलेले वर्णन कमालीचे भावपूर्ण आहे. असेच भावपूर्ण वर्णन त्यांनी जपानमधल्या मुलांचे केले आहे. त्यांनी म्हटले आहे,''आणि पाय

फुटलेली जपानी पोरं तर रंगीबेरंगी कोबीचा गड्डा चालावा तशी लुटलुट असतात. जपानमध्ये सर्वात प्रेक्षणीय असे जर काही असेल तर ही जपानी मुले. त्यांतून हौशी आया त्या चिमण्या पोरांना मारे किमोनो – ओबी वगैरे चढवतात आणि असल्या दहाबारा पोरी निघाल्या की, फुलांच्या ताटव्यांना पावले फुटल्याचा भास होतो. एवढी एवढी गिड्डी गुबगुबीत पोरे, लोकरीच्या रंगीबेरंगी कपड्यात गुंडाळलेली, आईच्या पाठीला बांधलेल्या झोळीतून माना बाहेर काढून पाहायला लागली की, त्या सूर्याच्या देशात सूर्यफूल फुलल्यासारखी दिसतात. त्या हॉटेलातल्या पाश्चात्य वातावरणात पाठीला पोरे बांधलेल्या ह्या जपानी आया पाठीवरच्या त्या गड्ड्यांना घेऊन अत्यंत मोकळेपणाने वावरत होत्या.'' [९] बालकांविषयी थोडेच लिहिलेले असले तरी त्यातून त्यांचे बालकांविषयीचे प्रेम किती उत्कट आहे. याचा प्रत्यय येतो. प्रसंगी मधून मधून त्यांनी स्त्री स्वभावाची नमूने ही रेखाटली आहेत. पाश्चात्य देशातील स्वतःचे सौंदर्य सांभाळण्यात मग्न असले तरी तरुण व वृध्द स्त्रीया, सौंदर्याचे प्रदर्शन करणाऱ्या तरुण मुली, पूर्वेकडील देशातील कष्टकरी व उद्योगशील स्त्रीया जपानमधील लाघवी गेयशा, यांचीही त्यांनी सुंदर रेखाटने केली आहेत. ही विविध रेखाटने पाहिली की डॉ. भालचंद्र फडके यांची ''माणसात रंगलेला थोर अंतकरणाचा ललित लेखक'' [१०] असा जो पु. लं. गौरव केला आहे तो किती सार्थ आहे तो दिसून येतो.

### ४) मध्यमवर्गीय जाणीव

इंग्लंड, फ्रान्स, स्कॉटलंड, जर्मनी या पाश्चात्य देशांतून तर मलाया, इंडोनेशिया, बाली, जपान या पूर्वेकडील देशांतून प्रवास करताना त्यांनी त्या त्या प्रदेशांचे, त्या प्रदेशातील माणसांचे, त्या प्रदेशातील संस्कृतीचे वर्णन करताना नेहमीच आपला प्रदेश, आपली माणसे, आपली संस्कृती, यांच्याशी तुलना केली आहे. प्रवासाचा अनुभव घेताना ते नेहमी भारतीय संस्कृतीच्या दृष्टीकोनातून पाहतात. विशेषतः मराठी मध्यमवर्गीय माणसांच्या दृष्टीकोनातून ते प्रवासाचा अनुभव घेतात. त्यामूळे त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनातून मध्यमवर्गीय जाणीव ठळकपणे जाणवते. म्हणून डॉ. भालचंद्र फडके यांनी म्हटले आहे, ''भाऊसाहेब खांडेकर हे मध्यमवर्गाचे भाष्यकार आहेत तर पु. ल. मध्यमवर्गाचे खरेखुरे व्यंगचित्रकार आहेत..... ललित लेखकाच्या प्रकृती धर्माची जी जडण घडण होते त्यात तो ज्या वर्गात वाढतो, ज्या रीतीने अनुभव घेतो, जे वाङ्मयीन संस्कार त्यांच्यावर होत असताना त्याचा प्रामुख्याने समावेश असतो... 'असा मी असामी' किंवा 'बटाट्याची

चाळ' मधील लेखन वाचीत असताना पांढरपेशा मध्यम वर्गात वाढलेल्या पु. लं. चे सकस समृध्द व्यक्तिमत्व आपल्याला जाणवते." '११' त्याचे कारण स्वतः पु. लं. नी डॉ. आनंद यादव यांनी घेतलेल्या मुलखतीत स्पष्ट केले आहे. त्यांनी म्हटले आहे,"असेल... माझ्या साहित्यातला 'मी' हा माझ्या आसपासच्या मध्यमवर्गीय जीवनातून प्रातिनिधिक स्वरुपात आकाराला आलेला आहे. त्या जीवनाचे गुणधर्म त्याला चिकटलेले आहेत." '१२' असेच मत प्राध्यापक भीमराव कुलकर्णी यांनी व्यक्त करताना म्हटले आहे", मध्यमवर्गीयांच्या चष्म्यातून जगाकडे पाहताना नव्या जगाच्या नव्या रुपातोल विसंगती त्यांनी मध्यमवर्गीयाला प्रिय वाटते अशा रीतीने दाखविले आहे. ह्या मध्यमवर्गावर त्यांचे प्रेम आहे, आणि हा प्रेमापोटी मध्यमवर्गातील मार्मिक विडंबन करीत असतात येईल. त्याच्याबद्दल ओसंडून वाहणारा अंतरीचा जिव्हाळा ते उमाळ्यासह व्यक्त करीत राहतात. '१३' मराठी साहित्यातील मान्यवर समीक्षकांनी व्यक्त केलेली ही मते पाहताना असे दिसून येते की पु.ल. देशपांडे यांच्या साहित्यात–म्हणूनच प्रवासवर्णन साहित्यात–त्यांची मध्यमवर्गीय जाणीव प्रकर्षाने व्यक्त झाली आहे.

**'अपूर्वाई'** मध्ये पाश्चात्य देशात प्रवासाला जाताना जी पूर्व तयारी करावी लागली त्या तयारीच्या प्रसंगी आलेल्या अनुभवांचे वर्णन करतात. त्यांनी जे वर्णन केले आहे त्यात त्यांची मध्यमवर्गीय जाणीव व्यक्त होते. सुट व बूट शिवून घेताना त्यांना जे वाटले त्यावर त्यांनी कलेले भाष्य मध्यमवर्गीय जाणीवेचा अविष्कार आहे. इंग्लंडमध्ये प्रणयी जोडपी मुक्तपणाने प्रेम लीला करतात हे पाहून त्यांचे भारतीय मन थरारुन जाते. इंग्लंडमध्ये स्त्री–पुरुष दोघांना ही सर्वच प्रकारचे मुक्त स्वातंत्र्य आहे. भरपूर काम करावे, पैसा कमवावा आणि मुक्त जीवन जगावे, या प्रवृत्तीमुळे त्याच्या जीवनाला जी गती आली आहे त्यात माणसांतील आपलेपणा हरवत चालला आहे याची त्यांना खंत वाटते त्यांनी म्हटले आहे, " इंग्रजांचे घर ही दिवसेंदिवस केवळ व्यावहारीक संस्था होऊ लागली आहे. स्वयंपाकघर हे यांत्रिक पाककेंद्र आहे आणि दिवाणखाना हे छोटे टेलिव्हीजन थिएटर झाले आहे. त्यामुळे घराचे घरपण जवळ जवळ नष्ट होत आले आहे..... 'इश्य' किंवा 'अय्या' म्हणारी इंग्रज स्त्री काही दिवसांनी लंडनच्या म्युझियममध्ये पाहावी लागेल...... विवाहित जोडप्यापेक्षा अविवाहित जोडपीच पाश्चात्य देशांत फार आढळतात..... इंग्रज नवरा होणे ही मात्र निराळीच गुलामगिरी आहे." १४ इंग्लंड मधल्या कुंटूब संस्थेबद्दल त्यांनी व्यक्त केलेली ही

सारी मते मराठी माणसाच्या मध्यम वर्गीय जाणीवेतून आली आहेत. इंग्लडमध्ये शॉपिंग करताना सगळेच काही व्यवस्थितीत असते. हे सांगताना त्यांनी म्हटले आहे, "मराठी मनाला त्यामुळे इंग्रज दुकानदाराच्या अगत्याने बरेच संकोचल्यासारखे होते. परंतु दोन आण्याची तेल आणि दीड आण्यात ले मीठमिरची ह्यातले आम्ही." (१२९–३०) या सारखी त्यांची प्रतिक्रियावादी वाक्ये मध्यमवर्गीय जाणीवेतून निर्माण झालेली आहेत. 'बुफे' ही जेवणाचा प्रकार त्यांच्या मध्यमवर्गीय मनाला आवरत नाही त्यावर त्यांनी केलेली मल्लिनाथी मध्यमवर्गीय जाणिवेतून आली आहे. कार्लाइलच्या घराला, शेक्सपिअर जन्मस्थळाला भेट देताना त्यांच्या मनात निर्माण आस्तिक भाव हाही मध्यमवर्गीयाच्या जाणीवेचा भाग आहे. " इंग्लंडच्या मुक्कामात मला चटकन हिंदुस्थानात जाऊन केळीच्या पानावर मऊमऊ भात वरण, लोणकढे तूप आणि ताज्या लिंबाची फोड त्यावर पिळून दोन खास खाऊन यावे, असे डोहाळे लागले होते." अशी प्रतिक्रीया व्यक्त करुन ते संस्कृतीची व्याख्या करतात, "बाजरीची भाकरी,– वांग्याची भरीत– भाताची मूद आणि वरण पंचगंगेचा काट,देवा समोर फोडलेला नारळ, आजीने सांगितलेल्या गोष्टी" यांचा जो उल्लेख केला आहे तो पाहिला की महाराष्ट्रातील मध्यम वर्गीय माणसाचे प्रेम दिसून येते. अशा प्रकारे पाश्चात्य देशातील प्रवासात त्यांना जे विविध प्रकारचे अनुभव आले त्यातील गुणांचे आणि दोषांचे वर्णन करताना त्यांनी ज्या प्रतिक्रिया व्यक्त केलया त्यातून त्याची मध्यमवर्गीय जाणीव स्पष्ट होते.

**'पूर्वरंग'** या त्याच्या प्रवासवर्णनात मध्यमवर्गीया जाणिवेचा अविष्कार झाला आह. जकार्ता मध्ये माणिकभाई या भारतीय माणसाच्या घरी गेल्यानंतर त्यांना भारतीय वातावरण आढळल्याने त्यांनी गौरव पूर्ण उल्लेख केला आहे. (पृ–७०) इंडोनेशियामध्ये मिस्टर रोज हे मंगलोरचे गृहस्थ त्यांना भेटतात त्यांनी भारतीय जीवनाच्या काढलेल्या आठवणी ऐकून पु.लं. च्या मध्यमवर्गीय जाणिवेला आनंद होतो. (पृ–७७–७८) इंडोनशियामध्ये गणेशाच्या मूर्ति आठवल्याने त्यांना आनंद होतो ही सुध्दा मध्यमवर्गीय जाणीव आहे. बाली बेटावर त्यांना कोकणी माणूस भेटतो त्याचे धार्मिक वागणे व बोलणे पाहून त्यांनी म्हटले आहे," नारळीपोफळीखाली फुलेली ती जत्रा भारतापासून हजारो मैल दूर भरली आहे की कधीकाळी प्रलयात कोकणात अडकून राहिलाय ते मला कळेना " '१५' ही त्यांची प्रतिक्रिया मराठी माणसाची पारंपारिकता दर्शविते. मलाया, इंडोनेशिया, बाली या बेटांवर भारतीय संस्कृतीच्या परंपरा अस्तित्वाचे पाहून पु. लं. च्या मध्यमवर्गीय जाणिवेला आनंद

होतो. त्यातून त्यांचे परंपरेवरचे प्रेम दिसून येते. या पूर्वेकडील देशात रामायण आणि महाभारत यातील विषयांवरील नाटके असतात याचा त्यांना कमालीचा आनंद होतो. यातूनही त्यांची मध्यमवर्गीय जाणीव व्यक्त होते. त्याचा एक परिणाम म्हणजे या पूर्वेकडील देशात त्यांना हिंदू व बौध्द धार्मियांची मंदिरे पाहताना त्यांना आनंद होतो. पूर्वीकडील देशातील अनुभव घेताना त्यांचे मध्यमवर्गीय मन नेहमीच जागृत असलेले दिसून येते.

पु.लं. च्या या दोन्ही पुस्तकांतील प्रवासवर्णने वाचताना ते मराठी माणसांच्या मध्यमवर्गीय जाणीवेतून सभोवतालच्या जीवनाचा कसा अनुभव घेतात याचा ठायीठायी प्रत्यय येतो. म्हणून डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी त्या संदर्भात केलेले भाष्य अर्थपूर्ण वाटते.''युरोप अमेरिकेचे, आशिया खंडातील नव्या संस्कृतीचे नव्या जगाचे दर्शन घेत असताना लेखकाच्या मनासमोर सदैव महाराष्ट्रातील मध्यमवर्ग तरळत जातो आणि तुलनेने त्याच्या गुणदोषांचे मान त्याच्या पदरात टाकीत टाकीत त्याचे अनुभवविश्व विस्तारीत आणि त्याला नवा अर्थ देत त्याचा विलास चालू राहातो''. '१६'

प्रवासवर्णनात आलेल्या विविध अनुभवांचा आविष्कार ते मध्यमवर्गीय जाणिवेतून करतात हे त्यांच्या व्यक्तिमत्वाचे ठळकपणे जाणवणारे एक वैशिष्ट्य होय.

**५) संस्कृतिप्रेम व विरोध जाणीवः–**

पु.लं. देशपांडे यांच्या ह्या दोन्ही प्रवासवर्णनातून पाश्चात्य संस्कृती व पौर्वात्य संस्कृती आणि त्याच्या तुलनेत भारतीय संस्कृतीत आढळणारे गुण, दोष यांचा आविष्कार अनेक ठिकाणी झाला आहे. मनुष्य त्याचा स्वभाव, तो ज्या समाजात राहातो, त्या समाजातील कुटूंब संस्था, सार्वजनीक व्यवहार, चालीरिती, रुढी, परंपरा, यांतून प्रत्येक प्रदेशातील मानवी समाजाची एक संस्कृती निर्माण होत असते. त्या संस्कृतीचे ते सूक्ष्म निरीक्षण करतात. त्या त्या संस्कृतिचे गुण विशेष पाहताना त्यातील विकृतींचे, दोषांचे ही ते चित्रण करतात. चित्रण करताना हे त्यांना भारतीय व महाराष्ट्रीय संस्कृतीची आठवण होते. त्यांना भारतीय संस्कृती बद्दल, मराठी संस्कृती बद्दल प्रेम आहे, आदर आहे. त्याच बरोबर या संस्कृतीतील दोषांची ही त्यांना जाणीव होते. याचाच परिणाम म्हणजे त्यांच्या ह्या दोन्ही पुस्तकांतील प्रवासवर्णनात संस्कृति–विरोधाचा अनेक ठिकाणी आविष्कार झाला आहे.

**'अपूर्वाई'**मध्ये इंग्लंडच्या प्रवासाला जाताना जी तयारी करावी लागली. त्यावेळेला वेगवेगळ्या कार्यालयातील कर्मचाऱ्यांचा, अधिकाऱ्यांचा जो विचित्र अनुभव आला त्याचे त्यांनी (पृ. २० ते ४०)या मध्ये केलेले वर्णन भारतीय लोकांच्या बेशिस्त व बेजबाबदार प्रवृत्तींवर चांगलाच प्रकाश टाकते. इंग्लंडमधील व भारतातील वैयक्तिक स्वच्छता व सार्वजनिक स्वच्छता या विषयी त्यांनी केले भाष्य त्या दृष्टीने पाहण्यासारखे आहे, "आपली खाजगी स्वच्छता पुष्कळ बरी, पण सामाजिक स्वच्छता काय पुसावी! आपल्या कुठल्याही गावातला कुठलाही चौक, सार्वजनिक बागा याची भरपूर साक्ष देतील. इंग्लंडमधल्या सार्वजनिक स्वच्छतेने आपण थक्क होतो. रस्त्यात केळ्याची साले नाहीत, पानाच्या पिचकाऱ्या नाहीत, बागेत भेळ खाऊन टाकलेले कागद नाहीत. इमारतीच्या मधल्या चौकात खरकट्या पत्रावळी नाहीत. रस्ते, बागा, क्रिडांगणे कशी अगदी लख्ख!" [१७]
लंडनचा भुयारी रेल्वेचा प्रवास तेथील स्टेशनावरील स्वच्छता टापटीप व शांतता याचे त्यांनी मनःपुर्वक कौतूक केले आहे. इंग्रजी प्रेमिकाच्या प्रेमातील मोकळेपणा स्त्रियांना मिळालेले स्वातंत्र्य, इंग्रज नवऱ्याचा घरकामातील सहभाग, यांचे वर्णन करताना या बाबतीत भारतीय स्त्री पुरुषांची असलेली प्रवृत्ती याचाही ते उल्लेख करतात. इंग्लंडमधल्या आगगाड्यातून प्रवास करताना तेथील वातावरण आपल्या भारतीय वातावरणापेक्षा कसे वेगळे आहे. याची त्यांनी मिष्कीलपणे केलेले वर्णन पाहाण्यासारखे आहे. (पृ.८६) पाश्चात्य देशातील कला, प्रेम, संगीत, निसर्गप्रेम त्यांना विलोभनीय वाटते. पाश्चात्य देशातील चर्च, आपल्यातील मंदिरे यातील विरोध अनेक ठिकाणी दाखविला आहे. ऑफिसमध्ये अधिकारी व शिपाई यांच्यात असणारे नाते परदेशात व आपल्याकडे कसे आहे. त्यातील विरोधही त्यांनी टिपला आहे. (पृ.१२४) केंब्रीज व ऑक्सफर्ड मधील प्राध्यापक, त्यांची ज्ञानसाधना,

व्यवसायातील निष्ठा सांगताना पु. लं. नी भारतीय विद्यापीठांतील प्राध्यापकांची दयनीय अवस्था विरोध पध्दतीने चित्रीत केली आहे. 'बुफे' या भोजनाच्या पध्दतीचे वर्णन करताना त्यांनी संस्कृती विरोध दाखविला आहे. फ्रेंच माणसे बोलताना खूप हातवारे करतात. तोच प्रकार गोव्यातील कोकणी माणसाच्या बाबतीत आढळतो. (पृ. २०१) पॅरिसमधील समाजजीवनात 'रति'भावनेला अधिक स्थान असल्याने त्यांच्या रंगेल जीवनाचे भेदक वर्णन रंगविले आहे. त्या दृष्टीने त्यांनी 'फ्रेंच मधील द्राक्ष संस्कृती आणि आपली रुद्राक्ष संस्कृती' या शब्दात जे वर्णन केले आहे ते अर्थपूर्ण

आहे. (पृ. २३८) वर त्यांनी संस्कृतीची केलेली व्याख्या पु. लं. च्या मनात संस्कृतीबद्दल पारंपारिक दृष्टीकोन कसा आहे याचे दर्शन घडविले. पाश्चात्यांचे जीवन भौतिकदृष्ट्या समृध्द असले तरी त्यांच्यातील माणूसपण संपत चालले आहे आणि कृत्रिम संस्कृती निर्माण होते आहे. असा एक तक्रारीचा सूर साऱ्या वर्णनातून जाणवत राहातो.

**'पूर्वरंग'**मध्ये' पूर्वेकडील देशात केलेल्या प्रवासात मात्र असा तक्रारीचा सूर फारसा आढळत नाही कारण "पूर्वेकडील देशांतील समाजामध्ये त्यांना आपल्याच भारतीय समाजाचे दर्शन घडते. भारतीय संस्कृती परंपराप्रिय आहे आणि रामायण महाभारतावर तिचा पिंड पोहचला आहे. तिचेच प्रतिबिंब त्यांना पूर्वेकडील देशांत आढळते. पूर्वेकडील देशांत अनेक भारतीय लोक आहेत त्यांनी आणि तेथील स्थानिक लोकांनी भारतातील हिंदू व बौध्द संस्कृतीचा वारसा टवटवीतपणे जोपासला आहे. यामुळे पु. लं. भारावून गेलेले दिसतात. पूर्वेकडील देशातील संस्कृतीमध्ये चिनी, इस्लामी, हिंदू, बौध्द अशा संस्कृतीचे एक मिश्रण झाले आहे. पूर्वेकडील देशांची संस्कृती वैशिष्ट्यपूर्ण बनली आहे. त्या वैशिष्ट्यांचा अनेक ठिकाणी त्यांनी वेध घेतला आहे.

इटालीयन जहाजातून प्रवास करताना त्यांना इटालीन जेवण करावे लागले. इटालीयन जवणातील शेवई व पिझ्झा हे पदार्थ खाताना आलेलया अनुभवाचे त्यांनी केलेल्या वर्णनातील दोन संस्कृतीतला विरोध जाणवतो. जहाजावर पाश्चात्य संगीत लावले होते आणि लोक प्रामुख्याने इंग्रजीतून संभाषण करीत होते. ही गोष्ट त्यांना आवडत नाही. आपणच आपल्या संस्कृतीची उपेक्षा करतो आणि पाश्चात्य संस्कृतीचे अकारण भ्रष्ट अनुकरण करतो. या संबंधी व्यक्त करताना त्यांनी म्हटले आहे,"आमच्या हिंदी पणाची आम्हांला एवढी लाज का? आमच्या कलांना आम्ही नाही विचारायचे तर कोणी? पण शेवटी गुणही कांचनाचाच आश्रय धरतात! जगभर भिकेची झोळी पसरणाऱ्या देशाची कसली संस्कृती आणि कसले कलागुण? हिंदूस्थानाबाहेर पडल्यावर ह्या आर्थिक दारिद्र्यातून निर्माण झालेल्या मनोदारिद्र्याची विविध स्वरुपे दिसल्यावर पदोपदी मान खाली घालावीशी वाटते. विशेषतः एखाद्या गोऱ्या माणसांच्या कळपात मिसळायला मिळावे म्हणून चाललेली लाचार धडपड पाहिली की उबग येतो!" [१८] याच बरोबर आपले लोक पाश्चात्य नृत्य करतात त्याबद्दलही त्यांनी संताप व्यक्त केला आहे. (पृ. ४२) मलेशियामध्ये चिनी वसाहतीतील असणाऱ्या ओंगळपाणाचे ते दर्शन घडवितात. (पृ. ५३) चिनी लोकांच्या स्वभावातील रहस्यमयता,

गुढपणा, ओंगळपणा याबद्दल ही त्यांनी तक्रारीचा सूर लावला आहे. मात्र पूर्वेकडील देशातील लोकांनी बुध्दाच्या भव्य निर्माण केलेल्या मूर्ती आणि त्यांची स्वच्छमंदिरे पाहून ते भावूक बनलेले दिसतात. पु. लं. ना माणसांनी कुठे गेले तरी आपल्याच संस्कृतीची जोपासना करावी असे वाटते. इंडोनेशियात एक कोकणी मनुष्य गावाकडच्या आठवणी सांगायला लागतो तेंव्हा ते सद्‌गतीत होतात आणि म्हणतात, ''ज्यांच्या जीवनाच्या मुळ्या मैलांच्या आणि वर्षाच्या ताटातुटीने, जळून जात नाहीत, विदेशी संस्काराच्या आघातांनी खांदल्या जात नाहीत, अशा लोकांच्यावरुन मला जीव ओवाळून टाकावासा वाटतो.'' '१९' मातृभूमीची आठवण करणारे अनेक भारतीय भेटले त्यांचे संस्कृतीवरचे व मातृभूमिवरचे प्रेम पाहून पु. लं. ना त्यांच्या विषयी आदर वाटायला लागतो. पूर्वेकडील देशांमध्ये शिस्त व स्वच्छता आढळत नाही. त्या बद्‌दल ते तक्रार करतात पण या प्रदेशातील लोक रामायण व महाभारतावरील नाटके मोठ्या आवडीने आणि भावूकतेने पाहातात. याचे त्यांना कौतुक वाटते. भारताप्रमाणे या पूर्वेकडील देशांत ही अंधश्रध्दा आहे याची त्यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. तथापि पूर्वेकडील या देशातील लोकांमध्ये नाट्य व संगीत प्रेम आहे. त्यामुळे पु. लं. ना त्यांच्याविषयी आत्मीयता वाटते. बॅकॉक शहरात कालवा संस्कृती आढळते. त्याचे त्यांनी वेधक चित्रण केले आहे. जपानी लोकांची उदयोगशिलता, निसर्गप्रेम त्यांनी मोठ्या कौतुकांनी वर्णिले आहे. त्यांचे आदरातिथ्य, हसरा चेहरा, त्यांना भावतो. जपानी लोक बुध्दमंदिरात कमालीचे धार्मिक वाटतात. तर हॉटेलमध्ये गेयशांबरोबर रंगेलपणा करतात. यातील विरोध नाट्य ही त्यांनी चांगले टिपले आहे. पूर्वेकडील देशात नाट्यकलावंत खूप मेहनत घेतात. परंतू आपल्या कडचे नाट्यकलावंत थोड्याशा प्रसिध्दीने उन्मत्त कसे होतात याची त्यांनी परस्पर विरोधी रेखाटलेली ( २६६, २७१,)चित्रे संस्कृती विरोध दाखविण्याच्या दृष्टीने बोलकी आहेत.

पु. ल. देशपांडे यांच्या या दोन्ही ही पुस्तकांतून प्रवासवर्णन वाचत असताना असे जाणवते की, त्यांचे जुन्यावर म्हणजे परंपरेवर प्रेम आहे. अर्थात हे प्रेम आंधळे नाही. या संदर्भात त्यांनी डॉ. आनंद यादव यांना दिलेल्या मुलाखतीमधील दिलेले मत अधिक महत्वाचे वाटते. त्यांनी म्हटले आहे,'' जुन्या अनेक अनिष्ठ चालीरीतींवर मी माझ्या पध्दतीन टीका केलेली आहे. नव्या अनेक चांगल्या गोष्टींचा मी हिरीहिरीनं पुरस्कार केलेला आहे. जीवनातल्या चांगल्या भल्या गोष्टींवर प्रेम करणारा 'मी' माणूस आहे. मग ते नवं असो नाही तर जूनं असो. आता अनेकदा नव्या गोष्टी

केवळ फॅड म्हणून फॅशन म्हणून विचार न करता स्वीकारल्या जातात. नि त्या चमत्कारीक, उथळ दिसायला लागतात. त्याला मी तरी काय करणार? कोणत्याही नव्या गोष्टीला सुधारणा म्हणणं हे जस मूर्खपणाचं आहे. तसं कोणत्याही जूनी गोष्टी विचार न करता सोडून देण, हे ही तितकंच मुर्खपणाच आहे." '२०' यातूनच त्यांना संस्कृति विरोध का जाणवतो याचे स्पष्टीकरण मिळते.

संस्कृतीच्या परंपरेवर प्रेम करण्याची त्यांची प्रवृत्ती आणि भारतीय संस्कृतीच्या दृष्टीकोनातून पाश्चात्य संस्कृतीत आढळणारा विरोध ते स्पष्टपणे रेखाटतात. ही परस्पर विरोधी चित्रे रेखाटण्यात त्यांना अधिक रस आहे असे सातत्याने जाणवत राहतो.

### ६) चिंतनशीलता

पु. ल. देशापांडे हे विनोदी लेखक असल्याने त्यांच्या इतर वाङमय प्रकाराप्रमाणे त्यांच्या प्रवासवर्णनपर लेखनात ही विनोदाचा आविष्कार झाला आहे. असे असले तरी पु. ल. देशपांडे यांचा पिंड हा चिंतनशील लेखकाचा आहे. त्यामुळे प्रवासात आलेल्या त्या अनेक अनुभवाचे चित्रण करताना त्यांनी मानवी जीवन आणि मानवी स्वभाव या विषयी वेळोवेळी जे भाष्य केले आहे. त्यातून त्यांच्या चिंतनशीलतेचा आविष्कार जाणवतो. पु. ल. देशपांडे यांची मानवी मूल्यांवर निष्ठा आहे. चिरंतन मानवी मुल्यांच्या आधारावर संस्कृतीची उभारणी होते. अशी त्यांची श्रध्दा आहे. विज्ञानाने किती सुधारणा केल्या असल्या तरी मानवी मूल्ये हरपता कामा नये. माणसा–माणसामधील संबंध भावात्मक राहावे, माणसांनी नैतिक मुल्यांची जोपासना करावी. असे त्यांना प्रकर्षाने जाणवते. म्हणून त्यांनी अनेक ठिकाणी केलेली भाष्ये त्यांच्या व्यक्तिमत्वातील चिंतनशीलतेचा प्रत्यय घडवितात. याची चर्चा याच लघुप्रबंधातील प्रकरण २ आशयसौंदर्य यामध्ये सविस्तर केली आहे. प्रकरण २ आशयसौंदर्य मधील विवेचन हे त्यांच्या चिंतनशीलतेवर अधिक प्रकाश टाकते. त्यामूळे येथे जास्त चर्चा करण्याची आवश्यकता नाही. या चिंतनशीलतेत त्यांचे परंपरेवरचे प्रेम दिसून येते ही गोष्ट खरी आहे. पण त्याचा अर्थ ते सनातनी आहेत. किंवा आधुनिक विचारांचे विरोधक आहेत. असे मात्र नाही. डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी "देशपांडेची वृत्ती मुलतः सनातनी आहे असा आक्षेप घेतला आहे,'२१' तर डॉ. आनंद यादव यांनी त्यांच्या मुलाखतीत ही म्हटले आहे, "तुमच्या साहित्यावर असा एक आरोप केला जातो की, ते कॉझर्व्हेटिव्ह आहे" '२२' असे म्हटले आहे. ही मते चिंतनीय आहेत या संदर्भात स्वतः पु. लं. नी दिलेले उत्तर

प्रांजळपणाचे आहे. त्यांनी म्हटले आहे,"जून्या अनेक अनिष्ट चालीरीतींवर मी माझ्या पध्दतीने टीका केलेली आहे. नव्या अनेक चांगल्या गोष्टींचा मी हिरीरीनं पुरस्कार केलेला आहे. जीवनातल्या चांगल्या, भल्या गोष्टींवर प्रेम करणारा मी माणूस आहे. मग ते नवं असो नाही तर जूनं असो. आता अनेकदा नव्या गोष्टी केवळ फॅड म्हणून, फॅशन म्हणून विचार न करता स्वीकारल्या जातात नि त्या चमत्कारीक, उथळ दिसायला लागतात. त्याला मी तरी काय करणार? कोणत्याही नव्या गोष्टीला सुधारणं म्हणणं हे जसं मूर्खपणाचं आहे तसं कोणत्याही जुन्या गोष्ट विचार न करता सोडून देणं, हे ही तितकंच मुर्खपणाचं आहे. कॉझर्व्हेटिव्हचा यात प्रश्न येतो कुठं? तसा मी फॅडिस्ट सुधारणावादीही नाही नि जूनाट परंपरावादीही नाही. मी असलोच तर जीवनवादी आहे. चांगलं, सुंदर दिसेल त्यावर जीव तोडून प्रेम करणारा आहे. मग ते जुनं असो अगर नवं असो. इथलं असो अगर परदेशातलं असो." [२३] पु. लं. च्या याच विचाराचा पाठ पुरावा, आक्षेप घेणाऱ्या डॉ. भीमराव कुलकर्णी यांनी केला आहे. त्यांनी म्हटले आहे,"वास्तविक पु. ल. देशपांडे यांचे कोणतेही वाङमय वाचत असताना प्रथम काही जाणवत असेल (किंबहुना अस्वस्थ करीत असेल) तर त्यांची प्रखर वैचारीक भूमिका, आपली संस्कृती, आपले संस्कार, आपल्या कला, आपले वाङमय, आपले राजकारण आणि समाजकारण यांचे अतिशय डोळस निरीक्षण करणे, या त्यांच्या वैचारीकतेमुळेच त्यांना आवश्यक वाटते. या वैचारीकतेमागे त्यांचे अत्यंत संपन्न, अष्टपैलू आणि जागरुक अशा कलावंताचे व्यक्तिमत्व उभे असल्याने त्यांची ही वैचारिकता अतिशय आत्मनिष्ठ अशा स्वरुपात सदैव अविष्कृत होते. या जागरुकतेपोटी समाजातील सर्व क्षेत्रांतील असंख्य विसंगती, अगणित सोंगे–ढोंगे, विपरीत कल्पना आणि अपरिमित मुखवटे इ. रोगट प्रवृत्तींचा ते सदैव समाचार घेताना दिसतात.... समाजाचे मोहरे 'श्रेयस'कडून झपाट्याने 'प्रेयस'कडे वळत असलेले पाहून ते अस्वस्थ होतात आणि उपहास–उपरोधाच्या प्रखर वाग्बाणांनी ते अशा प्रवृत्तीवर तुटून पडतात." [२४] याचा अर्थ पु. ल. देशपांडे यांचे विनोदी लेखन केवळ विनोदासाठी नसून त्या विनोदाच्या पाठींशी एक चिंतनशील व्यक्तित्व आहे.

### ७) आत्मपरीक्षण

विनोदी लेखक हा बहुदा बहिर्मुख प्रवृत्तींचा असतो. पंरतू पु. ल. देशपांडे यांची प्रवृत्ती चिंतनशील असल्याने त्यांच्या लेखनामध्ये अंतरर्मुखता ही जाणवते त्यामुळे इतरांचे दोष

दिग्दर्शन करताना ही ते आपल्या ही दोषाचे दिग्दर्शन करतात. स्वतःच्या व्यक्तित्वातील उणिवांचे व्यंगाचे चित्रण करतात. हे चित्रण जसे पु. लं. चे आहे. त्याचप्रमाणे ते ज्या मध्यमवर्गीयातून आले. त्या मराठी मध्यमवर्गीयांचे चित्रण असल्याने मराठी वाचकांना त्यांच्या लेखनात 'आत्मप्रत्यय' येतो. पु. ल. देशपांडे यांनी या दोन्ही प्रवासवर्णनपर पुस्तकांत स्वतःलाही विनोदाचा विषय केला आहे.

**'अपूर्वाई'**मध्ये प्रवासाची तयारी करताना सूट व बूट शिवण्याच्या प्रसंगाला त्या संदर्भात त्यांनी म्हटले आहे,"परमेश्वराने मुळात मला घडवताना देहाच्या भविष्यकालीन विस्ताराचा अंदाज घेऊन दोन पाय देण्याऐवजी चांगली पायाभरणी केल्यासारखे लंबेचौडे पाय दिले आहे" (पृ. १०) जी गत बूटाची तिच सुटाची कशी झाली व आपला देह कसा बेढब आहे याचे ही त्यांनी वर्णन केले आहे, "पुढे देहाच्या व्यंगावर बोट ठेवून पु. लं. तात्पर्य काढतात. ती मजेशिर आहे त्यांनी म्हटले आहे, "तात्पर्य, माझे जरासे मोठे पोट, वाकडे खांदे इत्यादी गोष्टी झाकणारा आणि उंची आणि शेप नसलेली मान उंच करुन दाखवणारा तो सूट अंगावर घालून मी प्रथम आरशात पाहिले तेव्हा तो सूट घालून जायला हिंदुस्थानात एक पुण्याच्या क्कार्टर गेटाजवळचे चर्च किंवा लंडन याखेरीज दुसरी जागा नाही याची मला खात्री पटली! माझ्या या सुटातल्या अवताराची बऱ्याच मंडळींना कुणकूण लागली असावी. कारण परदेशी जायच्या दिवशी बरेच लोक मला निरोप देण्याचे निमित्त करुन मला न्याहाळीत होते." '२५' प्रवासात पैसे किती घ्यावे पौंड शिलिंग काय असते या विषयाच्या अज्ञानाची त्यांनी स्पष्टपणे कबुली दिली आहे. भूगोल आणि गणित या विषयांच्या अज्ञानाबद्दल ही कबुली देताना त्यांनी म्हटले आहे, "भूगोल हा विषय मला गणिताइतकाच प्रिय पृथ्वीचा वाटोळेपणा माझ्या भूगोलाच्या पेपरात पहिल्या पानावर अनेक वेळा सिध्द झालेला आहे." (पृ.१६) पुढे एके ठिकाणी त्यांनी म्हटले आहे, "आजवर निपाणी, संकेश्वर, चिपळूण, रत्नागिरी, कोल्हापूर, फार फार तर नवी दिल्ली असली तिकिटे मागायची सवय, त्यामुळे लंडनचे तिकीट कसे मागायचे हा एक चिमुकला पेचच होता." (पृ.१६) मॉजिनी हॉटेलात जेवायला दोनचार मित्रांबरोबर ते जातात. पण खिशात पैसे नसल्यामुळे चहा बिस्किटे घेऊन परत येतात. या संदर्भात त्यांनी रेखाटलेला प्रसंग (पृ. १७, १८) अर्थपूर्ण आहे. इंग्लंड, स्कॉटलंड, फ्रान्स, जर्मनी या पाश्चात्य देशाचे वर्णन करताना पु. ल. देशपांडे मध्यमवर्गीय जाणीवेतून आपल्याला आलेल्या अनुभवाचे वर्णन करतात.

अशीच वर्णने **'पूर्वरंग'** ह्याही पुस्तकात आढळतात. पूर्वेकडील देशाचे आणि राजधानीचे नावे या विषयी ते अज्ञानी होते. त्यामुळे निर्माण झालेली घोटाळे याचे वर्णन केले आहे, ''मी खादाड नाही, पण खाण्यावर गाण्याइतकाच माझा लोभ आहे.'' असे एके ठिकाणी त्यांची कबुली आहे.(पृ.१४६) ''माझे आणि शिंप्याचे कधीच सूत जमले नाही ही गोष्ट मी कपडे घालायला लागल्यापासून मला पाहिलेल्या जगात तरी जगजाहीर आहे. भगवंताने हा देह एक डगळ पायजामा आणि त्याहून डगळ नेहरु शर्ट नामक ह्याच योजनेने घडविला आहे. अशी माझी ठाम श्रध्दा आहे. आमच्या लहानपणी आम्हां गरीब कारकुनांच्या पोरांच्या श्रीमंतीचे मोजमाप लंगोटीची शेपटाकडली बाजू किती लांब सोडली ह्यावर केले जात होते आणि फ्याशनची कमाल डोक्यावरची शेंडी नाकाच्या शेंड्याला लागते की नाही ह्यावर ओळखली जात होती.'' ....... अंगाला फिट्ट बसणारा सूट शिवावा तर अंगभूत बेढबपणा जाहीर होतो. तो झाकावा तर सूट बेढभ शिवावा लागतो...... आधुनिक फ्याशनीची, पोटाखाली पूर्वी कटदोरा बांधायची जागा असे तिथून सुरु होणारी पॅन्ट शिवावी तर कंबर आणि पोट ह्यांची सीमारेषा सापडणे कठीण! म्हणजे चढवताना मला आडवा घालून पोटावर पाय ठेवूनच ती चढवावी लागली असती. '२६' स्वतःच्या शरिराच्या बेढब पणाबद्दल तेवढे मोकळेपणाने लिहितात. असेच त्यांनी एक वर्णन केले आहे. जपानमध्ये नमस्कार करताना सतत वाकून नमस्कार करतात. त्या संबंधी त्यांनी म्हटले आहे ''ह्या जपानी मुजऱ्याच्या व्यायामाने माझा कटिभाग हत्तीच्या वळणावरुन महिनाभरात सिंहाच्या वळणावर जाईल असा सुखद विचार मला सहज चाटून गेला'' '२७'

या दोन्ही प्रवासवर्णनात पु. लं. नी स्वतः संबंधी जे अनेक उल्लेख केले आहेत. त्यातून त्यांचाच साधाभोळा स्वभाव दिसून येतो. या संदर्भात डॉ. आनंद यादव यांनी मुलाखतीत त्यांच्या संबंधी म्हटले आहे. त्यातून पु. लं. च्या व्यक्तिमत्वाचे सारे विशेष दिसून येतात. त्यांनी पु. लं. ना उद्देशून म्हटले आहे,''तुमच्या वाङमयातील 'मी' हा गबाळा, विसरभोळा, व्यवहारज्ञान फारसे नसलेला, सदैव आर्थिक ओढाताणीत असलेला, डोक्यात काही तरी वेड घेऊन वावरणारा असतो.'' '२८' डॉ. आनंद यादव यांनी त्यांच्या स्वभावाचे नेमके चित्रण केले आहे.

पु. ल. देशपांडे यांच्या 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' या दोन्ही प्रवासवर्णनाच्या पुस्तकात असे दिसून येते की, आपल्यातील दोषांची स्पष्ट कबुली देत त्यावर विनोद साधला आहे. यातून त्यांची

आत्मनिरीक्षणाची प्रवृत्ती दिसून येते.

## ८) काव्यप्रेम

पु. ल. देशपांडे यांचे साहित्यावर विशेषतः कवितेवर प्रेम आहे. या दोन्ही प्रवासवर्णनपर पुस्तकांत आपल्या प्रवासविषयक अनुभवांचे वर्णन करतात. त्यांनी संस्कृत आणि मराठीतील कवितांतील ओळींचा उल्लेख केला आहे. त्यांचे काव्यावर प्रेम आहे. असे दिसून येते. त्याचा एक परिणाम म्हणजे काही अनुभवांचे वर्णन करताना त्यांची भाषा काव्यमय होते. त्यामुळे काव्यमयता हा ही त्यांच्या व्यक्तिमत्वाचा विशेष मानावा लागेल. त्यांच्या प्रवासवर्णनातील अनेक उल्लेख काव्यमय आहेत. ते खालीलप्रमाणे

**अपूर्वाईतील काव्यमय वर्णन :**

१) भारतातून इंग्लंडकडे जाताना कैरोपर्यंतच्या प्रवासाचे वर्णन करताना त्यांनी (पृ.४६)वर केलेले वर्णन त्यांच्या काव्यमयतेचा प्रत्यय आणून देतो.

२) इंग्लंडमधला इंग्रज हा मातीवर किती प्रेम करतो हे सांगताना त्यांनी म्हटले आहे,''इंग्रज हा हाडाचा शेतकरीच आहे. हार्वे स्ट्रीटमधला मोठ्यांतला मोठा सर्जन असो किंवा ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटीतला तत्वाज्ञानाचा प्राध्यापक असो, त्याला चिखलात हात बुचकळून काढल्याखेरीज चैनच पडत नाही. तिथले मला भेटलेले गायक आणि नटदेखील कलेवरील चर्चा संपल्याबरोबर आपल्या बागेतील स्वतःची करामत दाखवायला मला घेऊन गेले. मला वाटते, बरेचसे इंग्रज बाग करायला कारण म्हणून घर घेत असावेत. स्वतःच्या परसातला कोबी किंवा टमाटो पाहूनच त्याला ढेकर येते, आणि म्हणूनच लंडनमध्ये नोकरी करणारे बहुतेक इंग्रज सुटी पडली रे पडली की खेड्यांच्या दिशेने पळतात, आणि मायभूमीच्या मातीत हात खुपसतात. म्हणूनच की काय कोण जाणे, इंग्रजांचे आपल्या मायभूमीवर अतोनात प्रेम आहे. माझी माती आणि माझे आकाश कसे आपण अभिमानाने म्हणतो, पण आमचा पांढरपेशा कधी भरल्या डोळ्यांनी आकाश पहात नाही आणि कधी आपले दोन्ही हात मातीने भरत नाही. नेहमीच ढगाळलेले आकाश उजळले की इंग्रज धावत त्याच्या छताखाली येतो आणि मोकळा वेळ मिळाला रे मिळाला की त्या मातीशी खेळत राहतो!'' '२१'

३) ''दिवस मावळताना एका डोंगरमाथ्यावर आम्ही गाडी थांबविली खाली खोल दरी होती.

दरीतच एक खेडे वसले होते. घरांच्या चिमण्यांमधून कापरा धूर येत होता. हायलंडर्सचे संध्याकाळचे भोजन तयार होत होते. गुबगुबीत मेंढरांचे कळप उतरणीला लागले होते. अशी भरदार मेंढरे मी आयुष्यात पाहिली नव्हती. मधून स्कॉटिश लोकांचा तो विशिष्ट पध्दतीचा स्कर्टवजा चट्टेरी आखूड झगा घातलेले तगडे हायलंडर्स रपरप करीत जाताना दिसत होते आणि त्या अंधुक प्रकाशात टमेलाचे विस्तीर्ण सरोवर उंच सूचिवृक्षांतून डोकावत होते. कोणत्याही सुंदर संध्यासमयी वाटणारी हुरहुर मनाला वाटत होती. सोबतचे व्हाईट कुटूंबही मोठे सौम्य होते. अशा त्या गूढ वातावरणात त्या खोल दरीतून एकाएकी बॅगपाईपचे स्वर त्या डोंगरमाथ्यावर उधळले गेले. त्या रम्य संध्याभावातालचे ते पुंगीसारखे स्वर इतके मिसळून गेले की, ते दृश्य मनात चित्रांकितच नव्हे तर स्वरांकितही होऊन गेले! लोणावळ्याला 'टायगर्स लीप' च्या कड्यावरुन तळकोकणची हिरवी शोभा पाहता पाहता पायथ्याच्या खेड्यांतून असेच अचानक सनई चौघड्यांचे कुण्या पाटलाच्या पोराच्या लग्नाच्या मांडवात वाजलेले सूर साऱ्या दरीत तुडूंब भरले होते. सनईची एक जादू आणि ह्या बॅगपाईपची दुसरी!'' '३०'

४) ''उंच घनदाट वृक्षांच्या राईत स्ट्रॅटफर्डचे चर्च उभे आहे. शेक्सपिअरच्या जन्माची नोंद इथे झाली. बेलिफाचे काम करणाऱ्या आपल्या बापाचे बोट धरुन तो प्रार्थनेला आला असेल, ॲना हॅथवेच्या चेहऱ्याकडे चोरुन पाहात त्याने इथेच 'नातिचरामि'ची शपथ घेतली असेल. आज तिथेच तो चिरनिद्रा घेत पडला आहे. एका बेलिफापोटी जन्माला आलेला स्ट्रॅटफर्डचा हा विल्यम साऱ्या जगात आपल्या गावाचा, कुळाचा आणि भाषेचा उध्दार करुन गेला. त्या वाङमयप्रभूच्या समाधीपाशी आपण उभे राहिलो की अवाक होतो. वास्तविक चारचौघांच्या थडग्यासारखे हे थडगे आहे. त्याचे खरे स्मारक एव्हान नदीच्या काठी उभे आहे. तिथे शेक्सपिअरचे शब्द वर्षातून आठ महिने देशोदेशींच्या प्रेक्षकांच्या अंतःकरणात लक्ष निनाद उमटवीत असतात. हजारो लाखो डोळे तिथे पाणावतात, हास्याची उधळत होते. पण त्या चर्चच्या गंभीर वातावरणातले ते त्या चिरनिद्रित महाकवीचे थडगे पाहिले की वाटते, हा माणूस ह्या एवढ्याशा बेटाला अपरंपार संपत्ती देऊन गेला! आज तीनचार शतके त्या शब्दसोनियाच्या खाणीतून धन लुटले जात आहे. पण त्या बावनकशी सोन्यातला तसूभर

कस कमी होत नाही. शब्दाची अमृतपुष्पे व्हावीत तर ही अशी एरवी मर्ढेकरांच्या भाषेत सांगायचे म्हणजे हे 'पांढऱ्यावर काळे' करीत बसायचे.... ज्ञानेश्वरांच्या ण्समाधीपाशी पोचेपर्यंत मराठी मनाच्या अहंकाराचे वस्त्र गळून पडलेले असते. शेक्सपिअरच्या समाधीने, नाट्याचा हा पंचमवेद पढू इच्छिणाऱ्या माझ्यासारख्या नगण्य माणसाची काय अवस्था केली, हे शब्दांनी कसे सांगू? शेक्सपिअरच्या समाधीला मनोमन प्रणाम करुन तिथून निघालो." '३१'

५) "सुंदर सुंदर बाहुल्यांना हेवा वाटावा अशी ही गुटगुटीत, सोनेरी, कुरळ्या केसांची इंग्लिश बालके आपले निळे निळे डोळे विस्फारुन दुकानांतल्या काचांपलीकडला खेळ पाहताना पाहून मला तर आनंदाने गदगदून यायचे. सांता क्लॉज हा मुलांचा सगळ्यांत आवडता देवदूत! हा ख्रिसमसच्या रात्री घरांच्या धुराड्यांतून गुपचूप खेळणी ठेवून जातो. इंग्लंडच्या मुक्कामात मी निरनिराळ्या दुकानांतून हिंडलो... शेकडो मुले त्या पाच पाचमजली खेळण्यांच्या दुकानांतली हजारो तऱ्हेची खेळणी अशा काही डोळ्यांनी पाहतात की आपण मुग्ध होऊन त्या चिमुकल्या डोळ्यांतल्या बाहुल्यांचा नाच पाहावा. पापण्यांची पाखरे काय भिरभिरतात, ओठांचे चंबू काय होतात. चिमुकल्या टाळ्यांचा पाकळ्या काय उधळतात." '३२'

### पूर्वरंगातील काव्यमय वर्णन

१) पूर्वरंगमधील इंडोनेशिया आणि बालीबेटाचे त्यांनी केलेले वर्णन, "इंडोनेशिया हा समुद्रात रत्न जडित कंठ फेकून द्यावा तसा एक पाचूच्या बेटाचा पुंजका आहे. पण बाली मात्र या कंठ्यातील कंठमणी. इंडोनेशियातल्या बेटांच्या समूहात बाली बेट एखाद्या ठिपक्यासारखेच, आपल्या गोव्याएवढे आणि गोव्यासारखेच. आपल्या नृत्य–गायन–शिल्पचित्र अशा विविध ललित कलांचा रंगीबेरंगी गोप विणणारे ह्या बेटात भारतीय संस्कृतीचे केवळ अवशेष आहेत. असे म्हणणे हा ह्या बेटाचा अपमान आहे. बाली हिंदूधर्म म्हणजे त्या प्राचीन भारतीय संस्कृतीचा, काळाने आणि हिंदू संस्कृतीच्या क्रूर विरोधकांनी लाथाडून मातीमोल केलेल्या अमृतकलशातला हजारो मैलांवर उडून टिकून राहिलेला अमृतबिंदू आहे. लक्ष मोती

उधळून मातीतच चूर होऊन जावे आणि एखादा मोती कुठे तरी दूर पडून तसाच अभंग राहावा तसे हे बाली बेट आहे.'' '३३'

२) ''आणि पाय फूटलेली जपानी पोरे तर रंगीबेरंगी कोबीचा गड्डा चालावा तशी लुटलुटत असतात. जपानमध्ये सर्वात प्रेक्षणीय असे जर काही असेल तर ही जपानी मुले. त्यांतून हौशी आया त्या चिमण्या पोरींना मारे किमोनो –ओबी वगैरे चढवतात आणि असल्या दहाबारा पोरी निघाल्या की, फुलांच्या ताटव्यांना पावले फुटल्याचा भास होतो. एवढी एवढी गिड्डी गुबगुबीत पोरे, लोकरीच्या रंगीबेरंगी कपड्यात गुंडाळलेली, आईच्या पाठीला बांधलेल्या झोळीतून माना बाहेर काढून पाहायला लागली की, त्या सूर्याच्या देशात सूर्यफुले फुलल्यासारखी दिसतात. त्या हॉटेलातल्या पाश्चात्य वातावरणात पाठीला पोरे बांधलेल्या ह्या जपानी आया पाठीवरच्या त्या गड्ड्यांना घेऊन अत्यंत मोकळेपणाने वावर होत्या. जपानी पुरुष मात्र आपल्या इकडल्या बायकांसारखे पोरांना कडेवर घेतात. ती गोजीरवाणी जपानी पिले, जपानी स्त्रियांचे ते रंगीबेरंगीत चालणे, त्यांची ती किलबिल, जपानी पुरुषांचे ते अभिवादन, त्या परिचारकांची ती हसरी आदब, हॉटेलच्या प्रतीक्षाकक्षातले ते शिलाविलासाने सजलेले चिमुकले उद्यान आणि दहाबारा टेलिफोन्सवरुन ऐकू येणारे ते लाघवी मोशमोशी.... पण छे! निक्को पाहिल्याशिवाय ह्यांपैकी कशालाही केक्को म्हणायचे नाही असे ठरवून मी ते दृश्य पाहात होतो''. '३४'

३) ''जपानी नृत्यात 'पंखा' ही एक महत्वाची बाब आहे. आपल्या नृत्यातल्या मुद्रा बोटांनी होतात, त्यांच्या पंख्यांनी होतात. मनुष्यप्राण्याची कल्पकता कुठे धावेल सांगता येत नाही. एक रंगीबेरंगी पंखा हातात घेऊन त्याच्या फिरवाफिरवीतून किती असंख्य विभ्रम होऊ शकतात ते पाहून मी थंड झालो. सख्यांनो, आपण डोंगरमाथ्यावर सहल करायला जाऊ या' येथपासून 'मी विरहाच्या आगीत पोळून निघते आहे. ग सखे 'येथपर्यंतची प्रेमकहाणी सकाकीबारा नुसती त्या पंख्याच्या हालचालीतून करुन दाखवीत होते. त्या रंगीबेरंगी पंख्याला वाचा फुटली होती जपानी स्त्रीजीवनात 'पंखा' ही मर्मबंधातली ठेव आहे. मनीचे सारे हितगुज ती सांगू शकते.'' '३५'

अशा प्रकारे या दोन्ही प्रवासवर्णनात पु. ल. देशपांडे यांनी काव्यमयरितीने रेखाटने केलेले

दिसून येते.

### ब) प्रवासवर्णनातील विनोदाचा आविष्कार

पु. ल. देशपांडे यांनी नाटक, व्यक्तिचित्रे, एकांकिका, बालनाट्य, चित्रपट अशा विविध वाङ्मय प्रकारातून लेखन केले असले तरी त्याचा मूळपिंड हा विनोदी लेखकाचा आहे. त्यामुळे त्यांच्या सर्वच वाङ्मय प्रकारातून त्यांनी लिहिलेल्या प्रवासवर्णनपर लेखनातून विनोदाचा आविष्कार झाला आहे. विनोद हा त्याच्या लेखनाचा स्थायीभाव आहे.

#### १) विनोदाचे स्वरुप

विनोद ही मानवी जीवनातील एक महत्वाची प्रवृत्ती आहे. विनोदातून हास्य निर्माण होते. हसणे आणि हसविणे ही मानवाची मूळ प्रवृत्ती आहे. मनुष्य हा प्राणी असला तरी इतर कोणत्याही प्राण्यामध्ये हसणे हे प्रवृत्ती नाही. कारण हसणे ही एक बौध्दिक प्रक्रिया आहे. कारण सर्व प्राणीमात्रांमध्ये मनुष्य हा एकमेव बौध्दिक शब्द प्राप्त झालेला प्राणी आहे. विशेषतः मनुष्य प्राण्याला भाषा हे साधन प्राप्त झाल्यामुळे त्याने विनोद निर्माण केला.

#### विनोद म्हणजे हास्य

विनोदामुळे हास्य निर्माण होते परंतू प्रत्येक हास्यातून विनोद निर्माण होतो असे नाही. हास्यामध्ये निर्मलता असेल तर तो विनोदाचा भाग असतो. ज्या हास्यामुळे दुसऱ्याची चेष्टा होते, दुसऱ्यांना दुःख होते. अपमान होतो. त्याला विनोद म्हणता येत नाही. विनोदात निर्मलता हवी असते. याचा अर्थ विनोद हा कोणाला दुःखविणारा नसावा. तो सर्वांनाच आनंद देणारा असावा. विनोद हा जो निर्माण होतो तो प्राधान्याने समाजजीवन आणि मनुष्य स्वभाव याच्या आधारे निर्माण होतो. म्हणून 'स्टीफन लीलॉक' याने विनोदाची केलेली व्याख्या अर्थपूर्ण आहे. त्याने म्हटले आहे,"जीवनातील विसंगतीचे सदयतेने केलेले चिंतन आणि त्याचा कलात्मक आविष्कार म्हणजे विनोद होय" '३६' पु. ल. देशपांडे यांच्या लेखनात हेच सूत्र सांभाळलेले दिसते.

### २) विनोदाचे प्रकार :

१) शब्दनिष्ठ विनोद. २) प्रसंगनिष्ठ, ३) स्वभावनिष्ठ विनोद. असे प्रमुख तीन प्रकार असून त्यामध्ये कोटी, अतिशोक्ती, विसंगती, उपरोध, इ. प्रकार त्यात समाविष्ट होतात.

### १) शब्दनिष्ठ विनोद :

पु. ल. देशपांडे यांच्या प्रवासवर्णनपर लेखनात शब्दनिष्ठेची अनेक उदाहरणे आहेत. यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ यांच्या संपादक व्दयानी म्हटल्याप्रमाणे शब्दनिष्ठ विनोदात शब्दाच्या आधारे विनोद साधला जातो. त्यांनी म्हटले आहे, ''यात शब्दांची पुनरावृत्ती, ताल, अनुप्रास, श्लेष आणि सूक्ष्म बुध्दीच्या अभ्यासकाला अवगत असलेल्या भाषेच्या सर्व क्लृप्त्या वापरल्या जातात.''[३७] पु. ल. देशपांडे यांच्या या दोन्ही प्रवासवर्णनात ते शब्दप्रभू असल्यामुळे शब्दनिष्ठ विनोदाची असंख्य उदाहरणे आढळतात.

**'अपूर्वाई'मधील उदाहरणे**

१) ''संन्याशाला शेंडीची गाठ मारायला लागणार नाही इतका वेळ टायची गाठ मारायला लागला.''(पृ.९)

२) हॉफकिन इन्स्टिट्यूटमध्ये बहुदा कुत्रा चावला नंतर इंजेक्शन दिले जाते. तेथे त्यांना कॉलरा व देवी याचे इंजेक्शन घेण्यासाठी जावे लागले. त्या संदर्भात त्यांनी म्हटले आहे,''माझ्या आयुष्यात अनेक कुत्री आली आणि गेली. पण एकानेही तोंड अगर पाय वर करुन माझ्याकडे वाट वाकडी केली नाही.'' (पृ. २१)

३) विमानाने प्रवास करायचा असल्यामुळे बोटीने प्रवास करण्याचा विचार सोडून द्यावा लागला. म्हणून त्यांनी म्हटले आहे,''परंतू काही कारणानी बोटीची कल्पना बुडवावी लागली.'' (पृ. २५)

४) ''माझ्या बसमध्ये औषधाला देखील तरुणी नव्हती. (पृ.१०३)

५) 'बूफे' जेवणाचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे. ''जेवणावर आडवा हात मारायचा असतो, उभा नव्हे'' (पृ. १५५)

६) फ्रान्समधील नाईट क्लब मधील कार्यक्रम पाहाताना त्यांनी म्हटले आहे, ''रती हे सत्य आहे' आणि 'उपरती मिथ्या आहे.'' (पृ.२१७)

७) फ्रान्समधल्या त्या द्राक्षसंस्कृतीतून परत आपल्या रुद्राक्षसंस्कृतीत यायची तयारी सुरु झाली.(पृ.२२६)

८) ''पदरदेखील नीट न सावरता येणाऱ्या पोरी इथे संसार कसे सावरणार ह्याची मला उगीचच

चिंता वाटत होती." (पृ.२३७)

९) परदेशी जाताना कागदापत्रांवर सही करावी लागते त्या संदर्भात त्यांनी म्हटले आहे,"आजवर मी या सहीतून कधीही सहीसलामत सुटलो नाही." (पृ. २२)

**पूर्वरंगातील उदाहरणे :**

१) "टोचून घेणे आणि टोचून बोलणे या दोन्ही बाबतीत मी अखिल महिला वर्गाला केव्हाच शरणागती लिहून दिली आहे." (पृ.११)

२) "दुसऱ्या दिवशी त्या रुष्ट देवीकडून देवी टोचून घेतल्या ही देवी – डॉक्टरीण म्युन्सिपाल्टीच्या रस्ते खोदणाऱ्या खात्यातून बदली होऊन आलेली मुकादमीण होती की काय कुणास ठाऊक"(पृ.१३)

३) "टेबल ह्या वस्तूचा आधीच सरकारी उडवाउडवी आणि टोलवाटोलवी करण्याकडे दुरुपयोग होतो आहे तो काय कमी आहे? त्यात आणि ही चेंडूची टोलवाटोलवी कशाला?" (पृ.२७)

४) "आमची इंग्रजीत बातचीत सुरु झाली. म्हणजे बात तो करीत होता आणि चीत मी होत होतो."(पृ.३०)

५) "त्या मध्यम बांध्याच्या मंडळीत मीच लंकेतल्या राक्षसासारखा धिप्पाड दिसत होता. सिंहलीव्दीपाच्या सुंदरी मात्र अगदी सीतेवर पहारा करण्याच्याच लायकीच्या आहेत असे समजण्याचे कारण नाही. शुध्द कलात्मक हेतूने दोन तीन सुंदरींकडे मी दुसऱ्यांदादेखील पाहिले." (पृ.३४)

६) एका म्युझियममध्ये सिंहाच्या पुतळ्याच्या पाठीमागे लाल दिवा लावलेला होता. त्याचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे," त्यामूळे हे वनराज, व्याध मागे लागण्याऐवजी मुळव्याध लागल्यासारखे वाटतात. (पृ.५०)

७) मलाय भाषामध्ये रॉग नंबरला 'साला' म्हणतात. त्या शब्दावर त्यांनी केलेली कोटी सुंदर आहे. "मलाया भाषेत रॉग नंबर असे टेलिफोनवर म्हणायचे असेल तर 'साला!' म्हणतात." हे ऐकून त्या भाषेच्या यथार्थ शब्दयोजना–सामर्थ्यावर माझे एकदम प्रेम बसले.'ट्रिंग ट्रिंग' ऐसा 'खोटा नंबर' फिरल्यावर 'हॅलो, हॅलो' ला 'साला' ह्यासारखे समर्पक उत्तर दुसरे मला तरी सुचत नाही. (पृ.५४)

८) जकार्तामधील संस्कृतशब्दाचा दुकानाच्या नावासाठी केलेली उपयोग शब्दनिष्ठ विनोदाचा प्रकार होय."नकुल केमिस्ट!' दीर्घायु बॅंक! (बाकी बॅंकापेक्षा विमा कंपनीला हे नाव अधिक शोभले असते!) हॉटेलचे नाव धर्मनिर्मला! तर पोलिस ठाण्याचे नाव 'पुलिसी आश्रम"(पृ. ७२)

९) बाली बेटावर एका दुकानात विक्री करणाऱ्या मुलीचे वर्णन करताना त्यांनी म्हंटले आहे,"ह्या पोरी म्हणजे भलत्याच खट्याळ.... गिऱ्हाईकांवर त्या इतकी सुकुमार प्रहरणे टाकतात की गणपतीचे दर्शन घेऊन बाहेर आलेल्या प्रत्येक प्रवाशाचा 'मोरेश्वर' झालाच पाहिजे.... इंग्लंड अमेरिकेतल्या डिपार्टमेंट स्टोअर्स आणि सुपर मार्केट यांमधल्या पोरी गळ्यात टाय बांधतात, पण ह्या पोरी अशा तरबेज की त्यांनी वाट चुकलेल्या संन्याशाचा टाळूला नारळाची शेंडी चिटकवली असती." (पृ.११८)

१०) इंडोनेशियात महाभारतावर आधारीत पौराणिक नाटक पाहाताना अचानकपणे हनुमानाने प्रवेश केला त्याचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे."रामायणातल्या मारुतीची उडी इतकी लांब महाभारतापर्यंत जाईल ही कल्पना नव्हती." मी हळूच वासितोंना म्हटले, "डॉक्टर साहेब रामायणातला हनुमान महाभारतात कुठे आले?" हनुमान चिरंजीव आहे तेव्हा डॉक्टर वासितोंनी उत्तर दिले. महाभारतच काय पण तो कुठल्याही नाटकात येऊ शकेल." (पृ.१२६)

११) सयाममध्ये बुध्दमंदिरात अनेक भिक्षू आढळतात त्यांचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे,"काही कुटूंबवत्सल लोक देखील 'हा नको नको संसार' म्हणून टेंपररी भिक्षू होतात. भिक्षूंना पोलिस पकडत नाही. त्यांना माणसाचा कायदा लागू नसतो. काही धूर्त व्यापारी धंद्यात गफलती करुन 'काखा' वर करतात आणि छाट्या चढवतात..... आपल्याकडे हल्ली खादीच्या अभ्राचा उपयोग तोच पिवळ्या छाटीचा! असल्या लोकांपुढे बुध्ददेखील हतबुध्द होत असेल"(पृ.१४४)

१२) "चिनी लोक काडीने कोलंबी उचलतात तशा ह्या बायका एका वाक्याने नवऱ्याला उचलतात" (पृ.१७०)

१३) जपानमध्ये नमस्कार करताना कमरेत सतत वाकावे लागते. म्हणून त्यांनी म्हटले आहे,"ह्या

जपानी मुजऱ्याच्या व्यायामाने माझा कटिभाग हत्तीच्या वळणावरुन महिनाभरात सिंहाच्या वळणावार जाईल असा सुखद विचार मला सहज चाटून गेला." (पृ.१८५)

१४) जपानमध्ये मोठमोठी भव्य दुकाने असतात ती पाहूनच खरेदीचा मोह होतो म्हणून त्यांनी म्हटले आहे, "ह्या दुकानात खरेदीला गेलेला कुबेर भिकारी होऊन यायचा."(पृ. २७४)

या दोन्ही प्रवासवर्णनात शब्दनिष्ठ विनोदाची सर्वत्र आणि सतत पखरण केलेली आढळते. कोटीबाजपणा हा त्यांच्या भाषाशैलीचा एक महत्वाचा विशेष असल्याने त्यांच्या साऱ्या वर्णनात शब्दनिष्ठ विनोद सातत्याने येत राहातो. वाचकांना त्यांची प्रवासवर्णने आवडण्याची जी अनेक कारणे आहेत. त्यातील महत्वाचे कारण म्हणजे पु. लं. चा शब्दनिष्ठ विनोद, त्यांनी शब्दांच्या केलेल्या कोट्या.

**स्वभावनिष्ठ विनोदः**

पु. ल. देशपांडे याचे निरीक्षण, सूक्ष्म आहे त्यांनी म्हंटल्याप्रमाणे त्यांना माणसे फार आवडतात. त्यामुळे समाजजीवनात वावरताना त्यांनी अनेक विविध प्रकारची माणसे पाहिली आणि त्यांच्या स्वभावातील वैशिष्ट्ये शब्दांनी टिपली आहेत. मनुष्य स्वभावावर जेव्हा विनोद साधला जातो. तेंव्हा स्वभावनिष्ठ विनोद निर्माण होतो. डॉ. उषा कुलकर्णी आणि प्रा. निशा पाटील यांच्या शब्दात सांगायचे तर "स्वभावनिष्ठ विनोद हा मानवी स्वभावातील सुसह्य स्वभावविशेषावर आधारलेला असतो. व्यक्तीच्या स्वभावातील विशेषामूळे निर्भेळ विनोद उत्पन्न व्हावयाचा असेल तर त्याच्या दोषामुळे तिरस्कार वाटेल असे चित्रण न करता, त्याच्यामुळे गंमत कशी घडून येते, हे दाखविणे आवश्यक असते." '३८' पण त्यांनी म्हटल्याप्रमाणे हा विनोद सुसह्य स्वभाव विशेषावर असतो असे नाही. असह्य स्वभावविशेषावर सुध्दा असू शकतो. मानवी स्वभावातील अनेक दोषांचे, विकृतीचे असाधारणपणाचे विनोदी लेखन चित्रण करीत असतो. मानवी स्वभावातील अशा हास्यास्पद गुणाचे त्यांनी या दोन्ही प्रवासवर्णनातून वर्णन केले आहे.

**'अपूर्वाई'तील स्वभावनिष्ठ विनोद :**

इंग्लंडला जाताना विलायती पध्दतीचे कपडे शिवण्यासाठी ते एका विशिष्ट शिंप्याकडे जातात. आपण विलायतीकडे जाणाऱ्याचे कपडे शिवतो. याचा त्याला भारी अभिमान त्याच्या त्या

विशिष्ट स्वभावाचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे,"प्रथम मी विलायतेला जाणाऱ्या मंडळींपैकी आहे ह्या घटनेवर त्याचा विश्वासच बसेना. दुसरी गोष्ट विलायतेला त्यांने शिवलेल्या सूट हिंडत असल्याच्या जोरावर तो कापड फाडल्यासारखे इंग्रजी फाडत होता. मी त्याच्याशी हिंदी बोलत असूनही त्याने इंग्रजी आवरले नाही. अर्थात माझे हिंदी त्याच्या इंग्रजीइतकेच बिनअस्तराचे होते हा भाग निराळा! तिसरी गोष्ट म्हणजे त्याने प्रथम मापाला हात घालण्याऐवजी लंडनला आपले सूट पाहून अनेकांनी काय काय अभिप्राय व्यक्त केले आणि पिकॅडली सर्कसमधले शिंपीदेखील आपण शिवलेला सूट घातलेल्या हिंदी तरुणाना वाटेत आडवून शिंप्याचे नाव कसे विचारतात, इत्यादी गोष्टी काही कारण नसताना सांगितल्या. (अनुभवाअंती हे खोटे ठरले)...... शेवटी एकदाचा सूट झाला. तो मी अंगावर चढवून अपराध्यासारख्या त्याच्यापुढे उभा राहिलो आणि 'तुमचे सगळे डिफेक्ट्स मी खुबीने झाकले आहेत, आता खुशाल सूट घालून लंडनमध्ये फिरा – तुम्हाला मरण नाही– असा निकाल देऊन जवळजवळ अर्धसत्र रुपयांनी माझा जुना खिसा रिकामा केल्यावर त्याच्या आत्म्याची शांती झाली आणि एकदाचा मी सुट लो." [३९] शिंप्याचे केलेले वर्णन मार्मीक आहे. इंग्लंडला जाताना पु. लं. चे मित्र आणि नातेवाईक जे नाना विविध प्रकारचे सल्ले देतात. त्याचे त्यांनी अपूर्वाईच्या पहिल्या भागात केलेले वर्णन मानवी स्वभावरचे भाष्य आहे. परदेशाला न गेलेली माणसे ही परदेशी कसे वागावे सल्ले देतात हे हास्यास्पद आहे. प्रवासाला जाताना इंजेक्शने घ्यावी लागतात. त्यावेळेला दवाखान्यातील डॉक्टर आणि नर्स याचे वागणे तिकीट आणि पासपोर्ट काढताना विमानतळावरच्या ऑफिसातील कर्मचाऱ्याचे वागणे कसे चमत्कारिक असते. कस्टम अधिकारी कसे वागतात, याची त्यांनी केलेली वर्णने मानवी स्वभावाचे विशिष्ट नमूने आहेत. (पृ. २० ते ४०) लंडनमधल्या 'बॉबी' या पोलिसाचे त्यांनी कलेले वर्णन स्वभावनिष्ठ विनोदाचा प्रकार. त्याच्या स्वभावातील कठोरता आणि मृदूता या गुणाचे त्यांनी मिश्कीलपणाने वर्णन केले आहे, त्यांनी म्हटले आहे, "बॉबी हा आबालवृध्दांचा मित्र आहे. तो कधी रागवत नाही, चिडत नाही, चिरीमिरी मागत नाही... अहिंसा–सत्य–अस्तेयांचा तो पुतळा त्याच्या हातात शस्त्र नाही. समोर गुन्हेगाराची टोळी चाल करुन आली. तरी तो हात उगारत नाही. चोराला चोरी करताना देखील त्याच्या भावना न दुखावतील अशा बेताने तो पकडतो.... लंडनमध्ये तर मी ऐकले की चोरीच्या ठिकाणी चोराच्या आधी पोलीस उभा असतो. चोराला चांगली चोरी करु देतो आणि मग पकडतो.

(पृ. ६०, ६१) इंग्रज लोकांमध्ये शिष्टाचाराला फार महत्त्व आहे. इंग्रजाच्या स्वभावाचे वर्णन करताना एका कलावंताविषयी म्हटले आहे, "समोरच्या मृत्यूला नाटक करुन दाखविणारा हा इंग्रज! साक्षात यमदूत देखील साहेबाला उचलायला आधी अपॉईंटमेंट घेऊन, दारावरची घंटी वाजवून, आपल्या नावाचे कार्ड पाठवून, हॅट आणि छत्री, कोपऱ्यातल्या स्टॅंडवर ठेवून येत असेल आणि तो मिनिटभर आधी झाला तर साहेबाचा बटलर त्याच्यापुढे सकाळचा टाइम्स टाकून मिनिटभर वाट पाहायला लावीत असे." [४०]

**'पूर्वरंग'**मध्येपुर्वेकडच्या देशांमध्ये प्रवास करायला जाताना पु. लं. एका इटाली बोटीवरुन निघाले. ती बोट प्रथमता कोलंबो बंदरावर थांबते या बोटीत मलेशियाचे राजे असल्याने त्यांच्या स्वागताची तयारी चालली होती. परंतु बंदरातील कामगाराचा संप असल्याने सरकारी कचेरीतील कर्मचारी स्वागताचे तयारी करीत होते. त्याचे त्यांनी केलेले वर्णन सरकारी खात्याच्या कर्मचाऱ्यांच्या स्वभावाचे मार्मिक वर्णन करणारे आहे. त्यांनी म्हटले आहे, "एकाने एका ठिकाणी कुंड्या मांडल्या की दुसरा तिसरीकडेच उचलून नेई. पुन्हा चर्चा! तेवढ्यात वाऱ्याने त्या लाल गालिच्याचा उडता गालिचा होई. मग दहा बारा लोक त्या गालिच्या मागे लागत. तेवढ्यात लांबलचक मोटारीतून कुणीतरी बडा साहेब येई. त्याच्या भोवती चार लोक अत्यादरपूर्वक उभे राहत. सलाम होत. मग तो सूचना देई. पुन्हा कुंड्याची उचल बांगडी! तेवढ्यात दौतीखेरीज काहीच उचलण्याची सवय नसलेल्या कारकुनाने आपण अंग मोडून काम करीत आहोत हे साहेबावर ठसवण्यासाठी उगीचच एक कुंडी उचलून दुसरीकडे ठेवण्याचा प्रयत्न केला आणि हातून ती कुंडी निसटून गालीच्यावर माती पसरली मग तो गालिचा झटकण्याचे कार्य सुरु झाले. थोडक्यात म्हणजे लॉरेल आणि हार्डी यांच्या ताब्यात जर एखादा स्वागतसमारंभ दिला तर जी अवस्था होईल तस्से चालले होते! हा गोंधळ पाहण्यात दोन तास कसे गेले कळले नाही." [४१] इंडोनेशियामध्ये महाभारतावरचे पौराणिक नाटक पाह्यला जाताना भारतीय संस्कृतीचा अभिमान असणाऱ्या डॉ. वासितो या प्राध्यापकाची त्यांनी मदत घेतली होती. वेगवेगळ्या संवादातून त्यांनी डॉ. वासितोचे संभाषण चातुर्य वर्णिले आहे. त्यांनी स्थापन केलेल्या संस्थेच्या बोध चिन्हावर 'महेशा–यक्षा–विवरा जन्मा' असे शब्द लिहिलेले होते. त्याचे त्यांनी केलेले स्पष्टीकरण मजेशीर आहे. (पृ. १२७) इंडोनेशियात रेल्वेने प्रवास करताना एका जकार्ता स्टेशनवर ते उतरले असताना अनेक टॅक्सीवाल्यानी त्यांना गराडा घातला आणि

आव्हाचा  समवेत भाडे मागू लागला. त्याचवेळी एक इंग्रज मनुष्य आपली अमेरिकन गाडी घेऊन आला आणि पु. लं. ना एका इच्छित स्थळी पोहचवियाचे आवश्वासन दिले तेव्हा टॅक्सीवाल्यानी गाडीवर हल्ली केला तेव्हा पु. लं. नी आपल्या हातातील तीन फूट लाकडी मूर्ती घेऊन त्या लोकांना म्हणाले 'इथून तुम्ही गेला नाही तर माझ्या हातातल्या ह्या शस्त्राने मी ह्याचे टाळके फोडीन! पु. लं. चा तो पवित्रा पाहून टक्सीवाले हाटले पण काही तरी अर्वाच्य बोलू लागले. पु. लं. नी म्हटले आहे, ''मीदेखील हवेत पाचपंचवीस कोल्हापूरी शिव्या हाणल्या आणि स्वतःचे मानसिक समाधान करुन घेतले.'' (पृ. १३४) या प्रसंगातून टॅक्सी ड्रायव्हर लोकांची मानसिकता आणि स्वतःची मध्यमवर्गीय  मानसिकता यावर पु. लं. नी चांगला प्रकाश टाकला आहे. हॉगकॉंगमध्ये जगातल्या वेगवेगळ्या देशातील लोक व्यापाराच्या निमित्ताने येऊन स्थायीक झाले आहेत. त्या प्रत्येकांची संस्कृती वेगळी असली तरी त्यांनी आपापली संस्कृती टिकविण्याचा कसा प्रयत्न केला आहे. याची त्यांनी अनेक उदाहरणे दिली आहेत. त्यातून माणसांना आपल्या मातृभूमीची किती ओढ असते याचे दर्शन घडविले आहे. (पृ. १६२ ते १७८) जपानी लोक धार्मिक प्रवृत्तीचे आहेत. त्यामुळे मठमंदिरामध्ये ते कमालीच्या शांततेने, श्रध्देने आदरातिथ्याने वागतात. परंतु त्यांच्यावर अमेरिकन संस्कृतीच्या व्यापारी प्रवृत्तीच्या पगडा असल्यामुळे ते हॉटेलमध्ये क्लबमध्ये मात्र स्वच्छंदपणे वागतात त्यांच्या स्वभावातील परस्पर–विरोध त्यांनी अनेक प्रसंगांतून दाखविले आहेत. जपानी लोकाच्या स्वभावात आदरातिथ्य असल्याने त्याचे वागणे आणि बोलणे कमालीचे भावूक असते हे त्यांनी जपानी खानावळ बाईच्या व्दारे दाखवून जपानी लोकांच्या स्वभाववैशिष्ट्याचे सुंदर दर्शन घडविलेले आहे. विशेषतः अतिथींना निरोप देताना ज्या पध्दतीने 'सायोनारा' म्हणतात त्याचे त्यांनी केलेले वर्णन जपानी लोकांचा स्वभाव दाखविते. (२०२–२०३) जपानी लोकांमध्ये 'हाराकिरी' (आत्महत्त्या) या पयोगाचे त्यांनी केलेले वर्णनही जपानी लोकाचे स्वभाववैशिष्ट्ये दाखविते. (पृ. २२२) जपानी लोकांची गृहरचना, त्यांचे चहा प्रेम, पुष्पप्रेम, त्यांना असलेली निसर्गाची आवड, यांची त्यांनी अनेक ठिकाणी केलेली वर्णने जपानी लोकाचे स्वभाव वैशिष्ट्ये दाखवितात. एका जपानी नाटकाचा प्रयोग पाहताना त्यांनी जपानी व भारतीय प्रेक्षकाचे केलेले वर्णन स्वभावदृष्ट्या अर्थपूर्ण आहे. त्यांनी म्हटले आहे, ''तिकीटासाठी खूप लांब क्यू होता. दोहीनी त्या रांगेतच उभ्या असलेल्या एका जपानी गृहस्थांची व माझी ओळख करुन दिली. ते वासेदा विद्यापीठाचे व्हाइसचॅन्सेलर

होते नाटकाच्या तिकिटासाठी उपकुलगुरु सामान्य नागरिकासारखे बारीत नंबर लावून उभे होते. आमच्याकडे उपकुलगुरु तर जाऊ दे, पण उपसंपादकाचीदेखील आमंत्रणाची अक्षत घेऊन नाटकवाल्यांनी आपल्या घरी यावे अशी अपेक्षा असते. असल्या लहानसहान अनुभवांतून राष्ट्रांचे दर्शन घडते. रात्रंदिवस 'जन्ता—जन्ता—जन्तेचं राज्य' असा कंठशोष करणाऱ्या आमच्या मंत्री—उपमंत्र्यांना तर सोडाच पण मुन्सिपाल्टीच्या फडतुस मेंबरांनादेखील प्रेक्षागारात मानापमानाचा प्रयोग करायची हुक्की येते. हे नवे जातिभेद जुन्याहूनही उपद्रवी आहेत. जपानी नाटकवाल्यांच्या मागे सरकारी आणि पुढारी मंडळीचा फुकट पासांचा ससेमिरा नाही हे ऐकून मला त्यांच्या भाग्याचा हेवा वाटला. आमच्या सार्वजनिक जीवनातला हा घाणेरडा फुकटेपणा कधी जाणार कोण जाणे!." [४२] असेच एक वर्णन नाट्यकलावंताच्या बाबतीत आले आहे. जपानमधील नाट्यकलावंत यश मिळविण्यासाठी किती परिश्रम घेतात. या उलट आपल्याकडे नटनटी झटपट कलावंत होण्यासाठी काय करतात याचे त्यांनी केलेले वर्णन सुध्दा जपान व भारत यातील रसिकांच्या स्वभवांचे वर्णन करतात. त्यानी म्हटले आहे, "दरवर्षी चाळीस किंवा पन्नास नवीन मुली घेतात. त्या जागांसाठी दोन दोन हजार अर्ज येतात. त्यांना कडक तालीम घ्यावी लागते. उमेदवारी करावी लागते. त्यानंतरच रंगभूमीवर जायची संधी मिळते. तेदेखील त्या तीनतीनशेंच्या तांड्यातली एक होऊन! ही तपश्चर्या किती वर्षे घडेल सांगता येत नाही. ह्यातून वाट काढून नटीची पदवी मिळवायची. ह्या कलावती कुठे आणि एखाद्या नाटकात तीन तीन प्रॉम्प्टर्सच्या मदतीने दोन प्रयोगांत काम केल्यानंतर 'मी माझ्या भूमिकेशी तादात्म्य कशी पावते?' यावर दुसऱ्याने लिहिलेली स्वतःची मुलाखत छापायच्या घाईला आलेल्या आमच्या सुविद्य व संसार सांभाळून इ. इ. बिरुदासकट काम करणाऱ्या कुलीन कलावती कुठे? जपानात अर्ध्या हळकुंडीचा पिवळेपणा चालत नाही. नाटक कंपनीतल्या नोकरीसाठी दोन दोन हजार मुलींचे अर्ज येतात. हे ऐकून मी हबकलो. बरे, पगार देखील फार नाही. अडीचतीनशेच्या घरात. आमच्याकडे नाटकात काम करायला त्यातल्या त्यात बऱ्यापैकी तरुणी मिळवायची म्हणजे आईपासून आजीपर्यन्त सगळ्याचे पाय धरीत बिचारा दिग्दर्शक हिंडत असतो. एवढे करुन सातआठ प्रयोग झाले की हौस पुरी होते. जपानातील ती भव्य थिएटरे तुडूंब भरलेली ती विशाल प्रेक्षागारे, तो नटनटींचा देखणा समुदाय, तो आधुनिक यंत्रविद्येचा उपयोग हे सारे पाहिल्यावर आमच्या नाट्यसंसार भातुकलीचा आहे असे वाटायला लागले." '[४३]' नाटकाच्या थिएटरप्रमाणे

डिपार्टमेंट स्टोअर्सचे वर्णन करताना त्यांनी जपान व भारतीय स्वभावाचे केलेले वर्णन मार्मिक आहे, त्यांनी म्हटले आहे, "इथे शेकडो मुली हसतमुखाने गिऱ्हाइकांच्या स्वागताला उभ्या आहेत. युरोप–अमेरिकेप्रमाणेच खरेदी हा आनंद आहे. आपल्याकडे मंडई करणे ही इंडियन पिनल कोडात नवी शिक्षा म्हणून घालायला हरकत नाही. काय तो उध्दटपणा! त्या दीड–दांडया! ते बसल्या जागीच पचाक्कन थुंकणे! ती चांगल्या भाजीत नासकी भाजी दडपायची धडपड! "तुझ्या बाऽऽनं चार अनेवाली मटार खाल्ली व्हती का दीड दमडीच्या?" हे स्वागत! आणि इथे? फिरत्या जिन्यावर "पाऊल जपून टाका बरं का साहेब" असे म्हणायला खास देखण्या पोरी उभ्या. वस्तूंच्या किमती नीट लिहिलेल्या. तुम्हांला हवी असलेली वस्तू मिळवून देण्याची धडपड! ह्या भव्य दुकानांतून नुसत्या वस्तूच मिळतात असे नाही. तिथे गिऱ्हाइकांच्या करमणुकीसाठी एखाद्या मजल्यावर छोटी नाट्यगृहे आहेत."[४४]

अशा प्रकारे पु. लं. देशपांडे यांनी या दोन्ही प्रवासवर्णनात वेगवेगळ्या प्रसंगातून त्या त्या प्रदेशातील माणसांचे स्वभावविशेष विनोदी पध्दतीने दाखविले आहेत, आणि त्याच वेळी त्याच्या विरोधात वाटतील असे भारतीय समाजातील स्वभावविशेष सुध्दा दाखविले आहेत. परस्पर विरोधी स्वभावचित्रणामुळे त्याच्या लेखनातील विनोदाची लज्जत वाढली आहे. हे स्वभाव विशेष दाखविताना पु. लं. देशपांडे गुणाचा गौरव करतात तर दोषांचा उपहास करतात. त्यामध्ये केवळ परदेशी संस्कृतीने ते केवळ दिपून गेले नाहीत किंवा भारतीय समाजातील माणसांबद्दल त्याच्या मनात न्यूनगंड आहे असे ही दिसत नाही. जे चांगले आहे त्याचा मनःपूर्वक गौरव करावा आणि जे चांगले नाही त्याचा उपहास करावा अशी त्याची समतोलभूमिका स्वभावनिष्ठ विनोदातून दिसून येते.

**प्रसंगनिष्ठ विनोद :**

प्रवास करताना लेखकाला विविध प्रकारचे अनुभव येत असतात. प्रवासात अनपेक्षितपणे अनेक घटना घडतात. त्यातील काही घटना मजेशीर असतात. अशा मजेशिर घटनांचे वर्णन विनोदी लेखक करीत असतो. त्यातून प्रसंगनिष्ठ विनोद निर्माण होतात. डॉ. उषा कुलकर्णी, प्रा. निशा पाटील यांनी या संदर्भात म्हटले आहे, "प्रसंगनिष्ठ विनोदात ज्या घटनांचा अंतर्भाव झालेला असतो त्या विपरित असतात किंवा त्या संकटांचा समावेश असतो. ते संकट असंबंध्द किंवा अनपेक्षित असते. त्याचा नेहमीच्या जीवनातील चाकोरीशी संबंध नसतो आणि त्यापासून होणारे

दु:ख इतके हलके असते की, घटनांव्दारे निर्माण होणाऱ्या आनंदाला ते बाधा आणू शकत नाहीत.''[४५]

पु. लं. देशपांडे यांच्या दोन्ही प्रवासवर्णनात प्रसंगनिष्ठ विनोदांची अनेक उदाहरणे आहेत. अर्थात त्यांनी ही प्रवासवर्णने अगदी मुक्तमनाने व स्वैरपध्दतीने लिहिलेली असल्यामुळे शब्दनिष्ठ विनोद, स्वभावनिष्ठ विनोद व प्रसंगनिष्ठ विनोद यांचा 'त्रिवेणी संगम' त्याच्या लेखनात आढळतो. त्यामुळे एकएक उदाहरण हे तिन्ही प्रकारात येऊ शकतात. म्हणून पुनरावृत्तीचा दोष टाळण्यासाठी काही नेमक्या उदाहरणांचाच उल्लेख करणे योग्य ठरेल. शब्दनिष्ठ विनोद व स्वभावनिष्ठ विनोद या प्रकारात जी उदाहरणे दिलेली आहेत. त्यामध्ये प्रसंगनिष्ठ विनोदांच्याही पाऊलखुणा दिसतात. कारण पु. ल. देशपांडे यांचा पिंड हा मूळातच विनोदी लेखक असल्यामुळे एखाद्या अनुभवाचे प्रसंगाचे चित्रण करताना ते मानवी स्वभावाचे दर्शन घडवितात आणि ते घडविताना आपल्या कोटीबाज भाषाशैलीने त्यामध्ये शब्दनिष्ठ विनोदाचा रंग ही मिसळून देतात.

**'अपूर्वाई'तील प्रसंगनिष्ठ विनोद :**

इंग्लंडच्या प्रवासाला जाताना सूट व बूट तयार करण्यासाठी ते ज्या शिंप्याकडे व चांभाराकडे जाताना त्यावेळच्या आलेल्या अनुभवाचे त्यांनी केलेले वर्णन प्रसंगनिष्ठ विनोदाचाच एक नमुना आहे. (पृ. १०,१२) परदेशी जाताना इंजेक्शन टोचून घेणे, तिकिट पासपोर्ट तपासून घेणे, ही कामे करताना त्यांना आलेले अनुभव सुध्दा प्रसंगनिष्ठ विनोदाचीच उदाहरणे आहे. त्यासंदर्भात त्यानी दिलेली एक आठवण प्रसंगनिष्ठ विनोदाचा एक उत्तम नमुना आहे. चित्रपटसृष्टीत काम करीत असताना एका टोळ नाक्यावर जकातीसाठी कारकुनाने त्याचा टांगा आडविला आणि भाऊसाहेब (वरचे अधिकारी) येईपर्यन्त त्यांना थांबायला सांगितले कारण त्या कारकुनाने पु. लं. ना एका चित्रपटात पाहिले होते. त्या प्रसंगाचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे, ''शेवटी पाच मिनिटांनी कानावरील जानवे मागे टाकीत भाऊसाहेब आले. लगेच त्या शिपायाने ''भाऊसाहेब, परवा आपण ह्यांच्या शिनेमा पाहिला ते'' अशी ओळख करुन दिली. ''खरंच की– माडगूळकर काय आपण? छान काम झालं आहे हो तुमचं'' असे म्हणून त्यानी उगीचच हसून घेतले.' 'हे माडगूळकर नव्हते भाऊसाहेब, हे पुल्देस पांडे!'' माझ्या नावाच्या चिंध्या करीत शिपाई सांगत होता. ''माडगूळकर म्हणजे ते बापाचा पार्ट केल्याले!'' ''हो हो, हे म्हणजे बाईच्या मागे लागलेले?

ढोलकी वाजवणारे? वा वा! चष्मा काढून ढोलकी वाजवायला जमलं का हो! छान! गणपा, चहा मागवा. केवळ भाऊसाहेबांना मला 'दाखवण्यासाठी' त्या जकातकारकुनाच्या शिपायान`टांगा अडवला होता. टांगेवालाही शिनेमातल्या हीरोला आपण नेत असल्याच्या खुषीत होता आणि गावात टांगा शिरताना प्रत्येक पानवाला, टेलर, सलूनवाले वगैरेंना ओरडून 'फुडच्या पावलातले' पूल्देसपांडे गावात आल्याची जाहिरात करीत त्याने मला इष्ट स्थळी सोडले होते.''[४६] त्यांचे विमान कैरोच्या विमानतळावर उतरले त्या वेळेला सुवेझ कालव्यामुळे युध्दजन्य परिस्थिती असल्याने विमानतळावर लष्करी, विमाने, तोफा, रणगाडे, ठेवलेली होती मात्र विमानतळावर फलक होता, 'इजिप्तमध्ये तुमचे हार्दिक स्वागत असो.' परस्पर विसंगत घटनेतून त्यांनी प्रसंगनिष्ठ विनोदाचा चांगली परिणाम साधली आहे.' (पृ. ४८, ४९) लंडनमध्ये थंड हवा असल्याने सहसा स्नान केले जात नाही. स्नान केले तरी ते आठवड्यातून एकदा केले जाते. त्या प्रसंगाचे त्यांनी केलेले वर्णन प्रसंगनिष्ठ विनोदाचाच एक नमुना होय. इग्लंडमधील स्वच्छ आणि शांत रेल्वेस्टेशन पाहिल्यानंतर भारतीय रेल्वेस्टेशनचा जो अनुभव येतो त्याचे त्यानी केलेले वर्णन सुध्दा पाहण्यासारखे आहे. (पृ. ८६) इंग्लंडमध्ये प्राणी संग्रहालय पाह्यली जातात. तेव्हा तेथील प्राण्यांचे घडलेले दर्शन वर्णीताना त्यांनी जो मजेशीर अनुभव सांगितला आहे. त्यातूनही प्रसंगनिष्ठ विनोदाचे दर्शन घडते. (पृ. १३४, १३५, १३६) प्रसंगनिष्ठ विनोदाचा सर्वात सुंदर नमुना म्हणजे फ्रान्समध्ये एका दुकानात दुध घेण्यासाठी ते जातात परंतु दुधाला फ्रेंच भाषेत काय म्हणतात हे त्यांना सांगता येईना आणि पु. लं. ची इंग्रजी भाषा विक्रेत्या मुलीला कळेना त्या प्रसंगाचे त्यांनी केलेले वर्णन पाहण्यासारखे आहे. त्यांनी लिहिले आहे, ''एकदा मला दूधाची बाटली हवी होती. मी घरुन दुधाला फ्रेंचमध्ये काय म्हणतात ते घोकत गेलो होतो आणि दुकानात शिरताच त्या फ्रेंच पोरीच्या 'ब्रॉजू मोसियो' च्या स्वागताने साखरेसारखा विरघळलो. दुधाला काय म्हणतात? शेवटी एका कागदावर माझ्या ड्रॉईंगमास्तरांचे स्मरण करुन गाय काढली. माझे आणि ड्रॉईंगचे बालवैर बोडस मास्तरांनी नेहमी म्हणावे, ''पुर्ष्या, एक रेघ सरळ ओढशील तर काय मरशील?'' त्यांची कृतज्ञतापूर्वक आठवण झाली. गाय काढली कसली? साक्षात गोहत्याच ती! त्या पोरीच्या डोक्यात काही प्रकाश पडेना. बरे, हल्ली विजेच्या यंत्राने गायीचे दूध काढतात हे वाचलेले. त्यामुळे दुध काढायची ॲक्शन देखील निरुपयोगी. शेवटी त्या गायीच्या आचळातून नळी काढून एका बाटलीच्या चित्रात बुडविली आणि

बाटली भोवती वर्तुळ काढले, आणि ओले–ओले किंवा असेच काही तरी ओरडत त्या पोरीने दुधाची बाटली पुढे केली." '४७'

एका चित्रप्रदर्शनात मोनालिसाचे चित्र पाहाताना त्यांना आपल्या ड्रॉईंग मास्तरांची आठवण येते त्या संदर्भात त्यांनी म्हटले आहे, "मेमरी ड्रॉईंगच्या एका परीक्षेत मी दोन लांब आडव्या रेघा आणि बऱ्याचशा उभ्या रेघा मारुन पाच मिनिटांत त्यांच्यापुढे कागद धरला होता. मास्तर म्हणाले, "काय काढलं आहेस हे?"

"शिडी." मी अभिमानाने म्हणालो.

"गधड्या, मग ती निदान उभी तरी काढायचीस.'

"पण मास्तर,उभी शिडी–भिंतीशिवाय उभी कशी राहिल" माझी शंका.

"तिरडीसारखी दिसतेय तुझी शिडी. त्याच्यावर एखाद्या माणसाला निजव आणि खाली लिही –कैलासवासी बोंडस् मास्तर!" ४८

'अपूर्वाई'तील ही प्रसंगचित्रे वाचकांची चांगलीच करमणूक करतात.

## 'पूर्वरंग'मधील प्रसंग निष्ठ विनोद

'पूर्वरंग'या प्रवासवर्णनातील त्यांनी अनेक विनोदी प्रसंग रंगविले आहेत. प्रवासाला जाण्यापूर्वी इंजेक्शने घ्यावे लागतात. त्यासाठी ते एका मुन्सिपाल्टीच्या दवाखान्यात जातात तेथील शिपाई, डॉक्टर, नर्सकसे वागतात. या प्रसंगाची त्यांनी विनोदनिष्ठ वर्णन केले आहे. (पृ. १२, १३) मलेशियात चिनी लिपीत आपले नांव लिहून घेताना कोणता अनुभव आला. याचे त्यांनी केलेले वर्णन मजेशीर आहे. "त्या चिन्याने प्रथम माझ्या पत्नीचे नाव लिहिण्याचा प्रयत्न केला. 'सुनीता' ही तीन अक्षरे चिनी चित्रलिपीत जमवता जमवता त्याला अर्धा तास लागला. बराच वेळ सुन सुन करीत त्याने 'सन्–यत्–सेन्' मधला सन् काढला. आणि नंतर असेच झुरळाच्या मिशा ना बेडकांच्या पायाचा छेद दिल्यासारखे काहीतरी चित्र काढला हे तुझ्या पत्नीचे नाव असे म्हणून माझे नाव विचारले मी पुरुषोत्तम लक्ष्मण देशपांडे असे ठणकावून सांगितल्यावर त्याने फक्त आरोळी ठोकून प्राण सोडला नाही एवढेच. त्याची ती डोळ्यांची चिनी फट फाटेपर्यंत विस्फारली आणि तो त्या बुध्द मंदिरात निर्वाणाप्रत गेल्यासारखा गडप झाला! माझे नाव लिहिणारा चिनी अजून जन्माला

यायचा आहे!''[४९] जकार्तामध्ये पौराणिक नाटक पाहायला जाताना जो भयानक अनुभव आला त्याचे त्यांनी केलेले वर्णन प्रसंगनिष्ठ विनोदाचा नमुना आहे. (पृ. ८०, ८१, ८२, ८३) हॉंगकॉंग मध्ये सुट शिवण्यासाठी एका चिनी शिंप्याकडे गेल्यानंतर आलेल्या अनुभवाचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे, ''शेवटी सूट शिवायला गेलो. माझ्या देहाकडे आपल्या डोळ्यांच्या फटीतून पाहाताना तो चिनी शिंपी चाचरला. अंगाला फिट्ट बसणारा सूट शिवावा तर अंगभूत बेढबपणा जाहीर होतो, तो झाकावा तर सूट बेढब शिवावा लागतो. तो चिनी शिंपी कात्रीत सापडला होता. आधुनिक फ्याशनची, पोटाखाली पूर्वी कटदोरा बांधायची जागा असे तिथून सुरु होणारी पॅंट शिवावी तर कंबर आणि पोट ह्यांची सीमारेषा सापडणे कठीण! म्हणजे चढवताना मला आडवा घालून पोटावर पाय ठेवूनच ती चढवावी लागली असती. बरे, जुनी बाबाशाही तुमान शिवावी तर त्याचे नाव बद्दू होऊन त्याच्या पोटावर पाया! माझ्या सुटाचे फिटींग करताना तो चिनी शिंपी असा नरमला होता की ज्याचे नाव ते! फासावर चढवायची शिक्षा लिहून झाल्यावर न्यायाधीश नीब मोडून टाकतात म्हणतात. मला सूट चढवल्यावर त्या चिनी शिंप्याने आपली सुई मोडली असेल.'' '[५०]' जपानमध्ये एका खाणावळीत ते जेवायला गेल्यानंतर त्यांचे ज्या पध्दतीने स्वागत करण्यात आले आणि त्यांच्या पत्नीच्या समोरच त्या खाणावळीतील सुंदर स्त्रियांनी त्यांचे ज्या पध्दतीने स्वागत केले तो नाट्यमय प्रसंग रंगविताना त्यांनी म्हटले आहे,''त्या रात्री जपानी खाणावळ म्हणजे काय ते मी प्रथम पाहिले. जपानी भाषेत तसल्या खाणावळींना रियोकान म्हणतात. एका टुमदार लाकडी घरात आम्ही शिरलो. दारातच पाचसहा बायका आमच्या स्वागताला उभ्या होत्या. त्यांनी कमरेत वाकूनवाकून आमचे जपानी स्वागत केले. त्यापैकी एकीने चटकन पुढे होऊन माझ्या बुटांचे बंद सोडवले आणि सपाता दिल्या. मग दुसरीने त्या लागडी घरातल्या भुलभुलैयासारख्या ओसऱ्यांमधून एका चौकटीपुढे उभे केले. तिसरीने चौकट सरकवली. आत जपानी दिवाणखाना होता. सुंदर ततामी पसरलेल्या. मध्यावरच एक काळीभोर लाकडी चौरंग मांडला होता. बसायला भोवताली पातळ उशा होत्या. कोपऱ्यात ताकोनोमा. तिथे सुंदर पुष्परचना, आम्ही चटयांनवर मांड्या घालून बसलो. त्या खाणावळीबाईंनी माझा कोट काढला. इतक्यात बांबूच्या, होडीच्या आकाराच्या छोट्या छोट्या ट्रेजमधून सुगंधित पाण्याने भिजलेले टुवाल घेऊन एक बाई आली. तिने माझे तोंड पुसण्यापूर्वी मीच चटकन तोंड पुसून टाकले आणि दिवसभर चालून अंग आंबले होते म्हणून

बसल्या बसल्या जरासे हातपाय ताणले. लगेच त्या जपानी दासीने माझे खांदे चेपायला सुरुवात केली. आमचे कुटुंब जरासे चपापले. मीही नाही म्हटले तरी गोरागोराच झालो. (माझ्या अंगभूत वर्णाला जितके गोरेमोरे होता येईल तितकाच!) काय बोलावे ते कळेना. एकीलाही जपानीखेरीज दुसरी भाषा येत असेल तर शपथ! त्या खाणावळीत उत्तम चिनी जेवण मिळत होते, याची खात्री करुनच तिथे गेलो होतो. कारण जपानी जेवणाच्या नुसत्या वासाने मी आधीच चीत झालो होतो. पण हे आतिथ्य कसे आवरावे ते कळेना. त्या बाया मधूनच पाय चेपायच्या सिगरेट काढीपर्यंत काडी पेटवून धरायच्या. व्दारकाधीशाच्या अंतःपुरात सुदामदेवाचे त्या बायांनी कसे हाले केले असतील ह्याची कल्पना आली. तरी सुदामदेव तिथे एकटाच गेला होता. मी ह्या स्त्रीराज्यात सहकुटुंब सापडलो होतो. हळूहळू खाद्यपदार्थ आले. साकेचे पेले भरले. जेवणातल्या तीनचार कोर्सेसनंतर एका परिचारीकेने हळूच समोरची ती चौकटीचौकटीची भिंत सरकवली आणि पुढले दृश्य पाहून माझा घास हातातच राहिला. पुन्हा एकदा सौंदर्याचा अनपेक्षित धक्का देण्याच्या जपानी स्वभावाचा प्रत्यय आला. समोर एक चिमुकले दगडी उद्यान होते. त्यातून एक चिमणा झरा खळखळत होता. पलीकडून पुलासारखी गॅलरी गेली होती. बहालावर ओळीने जपानी आकाशकंदीलासारखे दिवे टांगले होते. त्यांच्या मंद प्रकाशात तो झरा चमकत होता आणि सतारीचा झाला बाजावा तसा त्याचा स्वर चालला होता. पलीकडून कुठूनतरी सामिसेनवर गीत वाजत होते. (सुदैवाने कोणी गात मात्र नव्हते) चौरंगावर चिनी सुरस सुरसुधा राधियली होती. त्या दृश्याला स्वरांची आणि उजळत्या दीपांची साथ होती. साके आपले कार्य करीत होती. पाठीशी जपानीणबाई लडिवाळपणा करीत होत्या. क्याटोतल्या त्या जपानी खाणावळीतली रात्र बोरकरांच्या जपानी रमल्याच्या रात्रीचा याद दिलवून गेली. त्या कविवराच्याच मस्त शब्दांत सांगायचे म्हणजे 'जांबिया मधाचा मारि काळजात!' रियोकान सोडताना त्या दासीने पुन्हा बुटाचे बंद बांधले आणि सगळ्या जणींचा ताफा रांगेत उभा राहून दहा दहा वेळा वाकून म्हणाला, ''सायोनाऽऽरा – सायोनाऽऽरा!'' छे! जपानी बायकांचा सायोनारा छातीचे ठोके थांबवतो!'' [५५]

### अतिशयोक्तीतून साधलेला विनोद

पु. ल. देशपांडे याच्या प्रवासवर्णनपर लेखनात शब्दनिष्ठ, स्वभावनिष्ठ, प्रसंगनिष्ठ, विनोदाबरोबर अतिशयोक्तीतून साधलेला विनोद ही आढळून येतो. अतिशयोक्तीतून त्यांनी निर्माण

केलेला विनोद हा शब्दनिष्ठ विनोदाचाच एक भाग होय. त्यामध्ये काही कल्पनाविलासाचा ही भाग असतो.

**'अपूर्वाई'तील उदाहरणे :**

१) ''आमच्या सर्व स्वकीयानी तिथे एवढी गर्दी केली की मी अक्षरशः गुदमरुन गेलो. इतक्या लोकांच्या सुभेच्छा पाठीशी असताना चारी यंत्रे बिघडलेल्या विमानातून मी लंडनलाच काय पण वैकुंठापर्यंत जाऊन परत येईन याचा मला विश्वास वाटायला लागला.''(पृ.३५)

२) लंडनमधल्या बॉबीचे त्यांच्या शांतस्वभावाचे व त्याच बरोबर त्यांच्या कर्तव्यदक्षतेचे वर्णनं करताना

त्यांनी म्हटले आहे, ''लंडनचा पोलिस हा साऱ्या जगाचा कौतुकाचा विषय आहे..... त्याच्या हातात शस्त्र नाही. समोर गुन्हेगारांची टोळी चाल करुन आली तरी तो हात उगारत नाही. चोराला चोरी करतानादेखील त्यांच्या भावना न दुखावतील अशा बेताने तो पकडतो..... लंडनमध्ये तर मी ऐकले की चोरीच्या ठिकाणी चोराच्या आधी पोलिस उभा असतो! चोराला चांगली चोरी करु देतो आणि मग पकडतो.''(पृ. ६१)   ३) लंडन–फ्रान्स मध्ये थंड हवा असल्यामुळे सहसा अंघोळ केली जात नाही. त्या संबंधी त्यांनी म्हटले आहे. ''फ्रान्समध्ये तर कुणी अंघोळ केली तर वर्तमानपत्रात छापून येते म्हणतात. (पृ.६४)

४) एडिंबरातील रेल्वे स्टेशनवरचे शांत वातावरण पाहून त्यांना नाशिकच्या कुंभमेळ्याचे आठवण होते. एके वर्षी कुंभमेळ्याला पाच दहा लाख लोक जमतील असा अंदाज होता. परंतु प्रत्यक्षात फारच कमी लोक जमले हे सांगताना त्यांनी म्हटले आहे,''पहिली यात्रेकरु स्पेशल आली त्यातल्या गर्दीच्या स्वागताला खुद्द कलेक्टर, डी. एस. पी. यांच्यासारख्या जिल्हा अधिकाऱ्यांच्या खाशा स्वाऱ्या जातीने हजर झाल्या आणि पहिली स्पेशल ट्रेन फलाटाला लागली त्यातून एकूण चार भिकारी, दोन खिसेकापू आणि तीन विदाऊट तिकीट पॅशिंजेर उतरले म्हणतात. खरेखोटे पंचवटीचा रामच जाणे! (पृ.१००)

**'पूर्वरंगा'तील काही उदाहरणे**

१) म्युझियम पाहाताना म्युझियम किती रुक्ष गोष्ट असते. हे सांगताना त्यांनी म्हटले आहे,''औरंगजेबाचे खंजीर आणि टिपू सुलतानची चिलखते मी हिंदुस्थानातल्या हिंदुस्थानात बऱ्याच ठिकाणे पाहिली

आहेत. या दोघांनीही म्यूझियमध्ये ठेवण्यासाठी डझनभर खंजीर आणि चिलखते जवळ बाळगली होती काय कोण जाणे! कुठल्याशा महापुरुषाची कवटीदेखील अशाच दोन म्युझियम्स मध्ये आहे म्हणतात". (पृ. ३५)

'अपूर्वाई' पेक्षा पूर्वरंगात अतिशोक्तिचे उदाहरणे कमी आढळतात.

**क) प्रवासवर्णनातील काव्यमयता :**

पु. ल. देशपांडे हे विनोदी लेखक असले तरी त्यांच्यावर बालपणापासून काव्याचे संस्कार आहे. महाराष्ट्राच्या अनेक प्रमुख कवींच्या कवितांचे काव्य वाचनाचे त्यांनी कार्यक्रम केले आहेत. विशेषतः मर्ढेकरांच्या कवितेचे त्यांनी काव्यवाचनाने सपत्निक अनेक कार्यक्रम केले आहेत. याचाच अर्थ संगीत नाटकातील अनेक गीतांचा लेखनात जो उपयोग केला आहे. त्यावरुनही त्यांचे काव्यप्रेम दिसून येते. याचाच अर्थ कवितेवर त्यांचे प्रेम आहे. त्याचा परिणाम असा झाला आहे की, एकाद्या प्रसंगाचे, व्यक्तिचे वर्णन करताना त्यांच्या भाषाने काव्यरुप धारण केले आहे. त्यामुळे 'काव्यमयता' हा त्यांचा लेखनशैलीच एक विशेष होय.

**'अपूर्वाई'** मध्ये अशी काव्यमय वर्णने आली आहेत. त्यापैकी एक सुंदरवर्णन म्हणजे कैरोच्या प्रवासात वाळवंट दिसल्यावर त्यांच्या मनात आलेला विचार त्यांनी म्हंटले आहे."यापुढला कैरोपर्यंतचा प्रवास म्हणजे एका वाळवंटातून दुसऱ्या वाळवंटात चालला होता. मधून मधून दृश्यपालट म्हणून एखाद्या समुद्राची पट्टी दिसे. एरवी औषधालाही कुठे हिरवा रंग दिसत नव्हता. हा वाळवंटातून इस्लामची हिरवी पताका का फडफडली ते आता कळले. पैगंबराने आपल्या निशाणाचा रंग हिरवा ठेवण्यात कमालीची चतुराई दाखविली. ह्या वाळवंटातले लाखो अरब त्या हिरव्यामागून का गेले हे त्या वाळवंटावरुन उडत जाताना चटकन उमगते. महंमदाच्या कुराणाइतकेच, किंबहुना अधिक ते हिरवे निशाण आकर्षक आहे. रात्रीच्या वेळी, त्या महान वालुकासागरावर दिसणारा तो चंद्र आणि दिवसाच्या रखरखाटात डोळ्यांना विसावा देणारा तो हिरवा रंग यांची सांगड घालून महंमदाने त्यांच्या डोळ्यांचे पारणे इस्लामच्या निशाणावर फेडले आहे." '५२' हे वर्णन काव्यमय आहे. असेच वर्णन त्यांनी स्कॉटलंडमधल्या पिटलॉक्री या खेड्यातील केले आहे. वर्णन साधेच आहे परंतु भावपूर्ण आहे. त्यामुळे काव्यमय निर्माण झाली आहे. त्यांनी म्हटले आहे, "इंग्लंडची सारी शोभा या ग्रामीण इंग्लंडमध्ये आहे. छोटी छोटी वने, उपवने, ओहोळ आणि

ओढ्या एवढ्याच चिमुकल्या नद्या, लहानग्या टेकड्या, त्यांतून डोकावणारी ती टुमदार इंग्लीश खेडी, आकाशात घुसणारे प्रार्थनमंदीरांचे कळस, उतरणीवर चरणारे गायींचे किंवा मेंढरांचे कळप, तारांच्या कुंपणावर बसून धावत्या गाडीला हात दाखविणारी इंग्लिश मुलेमुली, एखाद्या नदीकाठी पाण्यात गळ टाकून बसलेला म्हातारा, मधून मधून दृष्टीपुढून सरकणारे एखादे हिरवेगार क्रीडांगण, त्यात रंगात आलेला गावठी क्रिकेटचा सामना, टेकडीवर नागमोडी धावत पळणारे रस्त्याचे मोहक वळण, रंगीबेरंगी लोकरी कार्डिगन्स घातलेल्या, सफरचंदी गालाच्या, सोनेरी केसांच्या तरुणींचा सायकलवरुन पिकनिकला निघालेला आणि रेल्वेच्या लेव्हल क्रॉसिंगशी अडकलेला घोळका, आगगाडीची टुमदार स्टेशने, एवढ्या एवढ्याशा घरातून डोकावून कडेवरच्या गुबगुबीत गुंड्याल आगगाडी दाखवणारी एखादी गृहिणी, खेड्यातल्या चर्चच्या दाराशी थबकलेल्या पाचसात इंग्लिश रमाकाकू ठमाकाकूंचा काळ्या झग्यांतला थवा, ओक वृक्षाखाली तोंडावर हॅट ओढून स्वस्थ झोपलेला एखादा म्हातारा धिप्पाड घोड्यांची जोडी नांगराला जोडून शेतात राबणारा शेतकरी, ठिकठिकाणी दिसणारी व्हिटनेज एलची जाहिरात, गावागावांना जोडणाऱ्या रस्त्यांतून पळणारी लालभडक बस ह्यातले एक एक दृश्य म्हणजे कवी चित्रकाराला आव्हान आहे." '५३' स्कॉटलंड मध्ये प्रवास करताना अचानकपणे त्यांना बॅगपाईपचे स्वर ऐकायला आले त्याचे त्यांनी केलेले वर्णन काव्यमयतेचाच एक आविष्कार आहे. त्यांनी म्हटले आहे," अशा त्या गूढ वातावरणात त्या खोल दरीतून एकाएकी बॅगपाईपचे स्वर त्या डोंगरमाथ्यावर उधळले गेले. त्या रम्य सांध्यभावात ते पुंगीसारखे स्वर इतके मिसळून गेले की, ते दृश्य मनात चित्रांकितच नव्हे तर स्वरांकितही होऊन गेले! लोणावळ्याला 'टायगर्स लीप' च्या कड्यावरुन तळकोकणची हिरवी शोभा पाहता पाहता पायथ्याच्या खेड्यांतून असेच अचानक सनई चौघड्यांचे कुण्या पाटलाच्या पोराच्या लग्नाच्या मांडवात वाजलेले सूर साऱ्या दरीत तुडूंब भरले आहे. सनईची एक जादू आणि ह्या बॅगपाईपची दुसरी! एकेका वाद्याची मौज आहे." '५४' 'स्ट्रॅटफर्ड'मध्ये शेक्सपिअरच्या घराचे व समाधीचे दर्शन घेताना आपल्या मनात उमटलेल्या विचारांचे त्यांनी भावपूर्ण वर्णन केले आहे. त्यांनी म्हटले आहे,"वास्तवीक चार चौघांच्या थडग्यासारखे हे थडगे आहे. याचे खरे स्मारक एव्हन नदीच्या काठी उभे आहे. तिथे शेक्सपिअरचे शब्द वर्षातून आठ महिने देशोदेशींच्या प्रेक्षकांच्या अंतःकरणात लक्ष निनाद उमटवीत असतात. हजारो लाखो डोळे तिथे पाणावतात, हास्याची उधळण होते. पण त्या चर्चच्या गंभीर वातावरणातले ते त्या

चिरनिद्रीत महाकवीचे थडगे पाहिले की वाटते, हा माणूस ह्या एवढ्याशा बेटाला अपरंपार संपत्ती देऊन गेला! आज तीनचार शतके त्या शब्दसोनियाच्या खाणीतून धन लुटले जात आहे. पण त्या बावनकशी सोन्यातला तसूभर कस कमी होत नाही. शब्दांची अमृतपुष्पे व्हावीत तर ही अशी एरवी मर्ढेकरांच्या भाषेत सांगायचे म्हणजे हे 'पांढऱ्यावर काळे' करीत बसायचे.'' '५५' यहुदी मेनुहिन याचे संगीत आणि नृत्य करणारी त्याची बहिण याचा कार्यक्रम पाहाताना आपल्या मनात उमटलेल्या विचाराचे भावनाचे त्यांनी काव्यमय वर्णन केले आहे त्यांनी म्हटले आहे,''वास्तविक इंग्लंडमधल्या मुक्कामात इतकी नाटके पाहिली, किती नामवंत नटांचे कसब पाहिले, रंगभूमीवर थक्क करुन टाकणारे देखावे पाहिले, पण अंतःकरणात उमटले आहे ते दृश्य मात्र त्या पिवळ्या फुलांच्या ताटव्यांत काळा सूट घातलेला तो देखणा मेनुहिन गुलाबी रंगाचा झगा घालून काळ्याशार पियानोच्या पांढऱ्या शुभ्र पट्ट्यांवरुन लीलेने आपल्या गुलाबी अंगुलीचे नर्तन करणारी त्याची बहीण आणि मागल्या बाजूला पार फेस्टिव्हल हॉलच्या तीनमजली छतापर्यंत पोचलेल्या ऑर्गनच्या त्या सोनेरी पाइप्स! त्या भव्य वास्तूतल्या गर्भागाराची ती किमया अद्‌भूत आहे! आयुष्यभर धन्य वाटावे, असे हे क्षण असतात. एडिंबराच्या किल्ल्यावरच्या बुरुजावर दूरवर काजव्यासारखा अंधाराला हलवून गेलेला तो बॅगपाईप वाजवणारा हायलंडर, कालप्रवाहाखाली नेऊन गतीचा विसर पडायला लावणारा हा यहुदी मेनुहिन! हे कलावंत असंख्य अंतःकरणाच्या गुहांमधून अशी काही चित्रे काढून जातात की, त्या सामान्य गुहांना अजंठ्याचे वैभव प्राप्त होते! विसाव्याच्या क्षणी आपले आपणच आत डोकवावे आणि तृप्त व्हावे!'' '५६' लंडनच्या 'हाईड पार्कमधल्या बागेचे ही त्यांनी काव्यमय वर्णन केले आहे,''हाईडपार्क मधल्या गेले चार महिने थंडीच्या कडाक्यात गारठलेल्या एका फुलाच्या वाफ्यातली रोपे पाळण्याच्या कठडयाला धरुन उभ्या राहिलेल्या बाळासारखी सूर्य किरणांच्या जाळीला धरुन उभी राहीली होती. आणि चिमण्या ओठांत चिमुकल्या दातांची हिरकणी लुकलुकावी तशी त्या पानांमागून इवली इवली पांढरीशुभ्र फुले डोकावत होती! '' '५७' इंग्लंडहून परत येताना त्यानी बोटीने प्रवास केला या प्रवासात त्यांना अनेक ठिकाणी समुद्र पाहायला मिळाला त्याचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे,'' – पण ह्या साऱ्या प्रवासात डोळे भरभरुन मी जर काही पाहिले असेल तर दर्या–पहाटे–दुपारी–संध्याकाळी–रात्री नुकताच उठलेला– झोपेतून जागा झालेला–निवांत पडलेला–चांदण्यात न्हालेला–दर्या! पॅरिसच्या कॅसिनोत एका तालात पाया उडवणाऱ्या पोरीसारख्या

माशांच्या टोळ्यांच्या टोळ्या पाण्यावरुन एका तालात उड्या मारुन जात एखादी प्रचंड लाट गगनाला वेधेत घेण्याच्या ईर्ष्येने निघे आणि शेख महंमदाच्या मनोराज्या सारखी फुटून जाई. काही थिटुकलया लाटा बोटीच्या अंगाशी चावटपणा करुन जात. रात्रीच्या वेळी विरुध दिशेने येणारी बोट आकाशातल्या नक्षत्रांशी स्पर्धा करणारी दिव्यांची आरास मिरवीत दूर दूर निघून जाई. कुठे एखादे दीपगृह चमकधमक करी, डेक–चेअरवर पडून अंगावर वारा घेत हे सारे देवाघराचे वैभव डोळयांत साठवीत असताना हृदय उचंबळून येई–डोळे उगीचच पाणावत ." [५८] एखादया दृश्याने, प्रसंगाने आपल्या मनात भावना उचबुळून आल्यावेळी पु.लं. नी त्याचे वर्णन करताना जी भाषा वापरली त्या भाषेत काव्यमयतेची सारी लक्षणे दिसून येतात.

**'पूर्वरंग'**मध्ये ही अशी काव्यमय वर्णने आली आहेत जकार्ताकडे प्रवास करताना मिस्टर रोज या भारतातील एका माणसाशी त्यांची ओळख होते. तो मंगळूरकडचा कोकणाच्या जवळचा त्या दोघाची जेव्हा भेट होते तेव्हा मिस्टर रोज भारतीय भाषेत काही आठवणी सांगू लागला गाणी गाऊ लागला त्या प्रसंगाचे पु.लं नी केलेले वर्णन विचार आणि भावना यांनी ओथंबलेले आहे. त्यानी म्हटले आहे," हा पठ्ठ्या बालपणी शिकलेली कोकणी गाणी गाऊ लागला होता, त्याच्या तरुणपणाच्या मुंबैच्या कथा सांगत होता! अधाशासारखे कोकणी बोलत होता. ज्यांच्या जीवनाच्या मुळ्या, मैलांच्या आणि वर्षाच्या ताटातुटीने जळून जात नाहीत, विदेशी संस्काराच्या आघातांनी खांदल्या जात नाहीत अशा लोकांच्यावरुन मला जीव ओवाळून टाकावासा वाटतो. रोजला लहानपणी खाल्लेल्या बांगड्याच्या आमटीची आणि पेजे बरोबर मिळणाऱ्या मिठातल्या आमलीची आठवण येत होती. व्यापारासाठी सारे जग पालथे घालणारा हा एकाकी अविवाहित इसम आयुष्याच्या अखेरीला व्यापाराच्या धकाबुकीतून सुटून मंगळूरला लाल कौलांच्या छपराखाली जाऊन राहणार होता," व्हाय,यू नो पी– एल्? थंय माका निस्त्याचो रोस आमली आमली आनी पॅज मॅळूतली. हांगा पयसॉ हा–पुण तॅं ना ! "(तिथे मला माशांच कालवण आमली आणि पेज मिळेल, इथे पैसा आहे पण ते नाही) पैशांच झाड जमिनीत मुळे नेऊ शकत नाही भिंतीवरचे ते 'मनी प्लॅट' देखील हवेतच मुळ्या सोडते. माणसाला मुळ्या जमिनीत न्यायच्या असतात. 'मायभूमी' 'मायबोली' वगैरे नित्याच्या परिचयाने गुळगुळीत झालेले शब्द मिस्टर रोजसारखा माणूस भेटला की हिऱ्याच्या तेजाने चमकून उठतात" [५९] इंडोनशिया आणि बाली या समुद्रातील बेटाचे त्यांनी केलेली वर्णन ही काव्यमय आहे.

त्यांनी म्हटले आहे, "इंडोनेशिया हा समुद्रात रत्नजडीत कंठ फेकून द्यावा तसा एक पाचूंच्या बेटाचा पुंजका आहे. पण बाली मात्र त्या कंठयातील कंठमणी.... बाली हिंदूधर्म म्हणजे त्या प्राचीन भारतीय संस्कृतीच्या काळाने आणि हिंदुसंस्कृतीच्या क्रूर विरोधकानी लाथाडून मातीमोल केलेल्या अमृतकलशातला हजारो मैलांवर उडून टिकून राहिलेला अमृत बिंदू आहे. लक्ष मोती उधळून मातीत चूर होऊन जावे आणि एखादा मोती कुठे तरी दूर पडून तसाच अभंग राहावा तसे बाली बेट आहे." '६०' जपानमध्ये अनेक हॉटेलमध्ये जाताना त्यांना अनेक स्त्रीया आपल्या मुलांबरोबर आलेल्या दिसल्या पु.लं ना बालकांविषयी फार प्रेम त्या बालकाचे वर्णन करताना म्हटले आहे," पाय फुटलेली जपानी पोरे तर रंगीबंरंगी कोबीचा गड्डा चालावा तशी लुटलुटत असतात. जपानमध्ये सर्वात प्रेक्षणीय असे जर काही असेल तर ही जपानी मुले. त्यांतून हौशी आया त्या चिमण्या पोरींना मारे किमोनो–ओबी वगैरे चढवतात आणि असल्या दहाबारा पोरी निघाल्या की, फुंलाच्या ताटव्यांना पावले फुटल्याचा भास होतो. एवढी एवढी गिड्डी गुबगुबीत पोरे, लोकरीच्या रंगीबेरंगी कपड्यात गुंडाळलेली, आईच्या पाठीला बांधलेल्या झोळीतून माना बाहेर काढून पाहायला लागली की, त्या सूर्याच्या देशात सूर्य फूले फुलल्यासारखे दिसतात. त्या हॉटेलातल्या पाश्चात्य वातावरणात पाठीला पोरे बांधलेल्या ह्या जपानी आया पाठीवरच्या त्या गड्डयांना घेऊन अत्यंत मोकळेपणाने वावरत होत्या." '६१' जपानी लहान मुलांचे त्यांनी काव्यमयवर्णन केले तसेच ते ज्या जपानी खाणावळीत जेवत होते त्या खाणावळ बाईने शेवटच्या दिवशी 'सायोनारा' म्हटले त्या निरोपाच्या प्रसंगाचे त्यांनी भावपूर्ण वर्णन केले आहे त्यांनी म्हटले आहे," सायोनारा" 'म्हणजे फिर मिलेंगें'! जपानी भाषेतला हा अंत्यत रम्य आणि हुरहूर लावणारा शब्द आहे. इथे तर सायोनारा म्हणणारी होती बिचारी म्हातारी. निक्कोच्या वाटेवरच्या एका लाकडी कोरीव सामानाच्या दुकानातली एक देखणी चतुर तरुणी आमच्या गळ्यात खूप वस्तू बांधून गेली होती. तिचा सायोनारा तर एखाद्या धुंद मैफिलीतल्या अखेरच्या आर्त भैरवीतल्या सरत्या स्वरांसारखा आजदेखील एखाद्या क्षणी बेचैन करतो. एकेका भाषेला एकेका शब्दाचे काय देणे मिळालेले असते 'सायोनारा' ही चारच अक्षराची जपानी विराणी आहे. ह्यातल्या 'ना' वर असा एक हलका हेलकावा असतो की त्याला जवाब नाही." '६२' जपानी स्त्रीया नृत्यामध्ये 'पंखा' वापरतात आणि त्या पंख्याचे विशिष्ट हलचालीने मानवी जीवनातील विविध भावभावनांचा आविष्कार कसा करतात याचे त्यांनी केलेले वर्णन ही काव्यमय आहे–(पृ–२६३)

अशा प्रकारे या दोन्ही प्रवासवर्णनात वर्णन करताना त्यांनी अनेक ठिकाणी काव्यमय भाषा वापरली आहे.

**(ड) प्रवासवर्णनातील निवेदनशैली व भाषाशैलीचे वैशिष्ट्ये**

पु.लं. देशपांडे याची 'अपूर्वाई' व 'पूर्वरंग' ही दोन्ही पुस्तके प्रवासवर्णनपर आहेत. प्रवासवर्णनपर लेखनात प्रवास करणाऱ्या लेखकाचे स्वःचेच अनुभव असतात. त्यामुळे लेखकातील 'मी' हाच त्याचा केंद्रबिंदू असतो. एका दृष्टीने लेखकातील प्रवासी 'मी' चे ते एक आत्मकथनच असते. त्यामुळे अशा लेखनाची भाषा व निवेदनशैली प्रथमपुरुषी म्हणजेच आत्मनिवेदनात्मक असते. पण हे निवेदन लेखकाच्या व्यक्तिमत्वाशी निगडीत असल्याने ती व्यक्तिपरत्वे, भिन्न भिन्न असू शकते. लेखकाचे विशिष्ट व्यक्तिमत्व त्यांच्या आवडी निवडी त्यांच्यावर झालेले संस्कार, त्यांचा जीवनाकडे पाहाण्याचा दृष्टीकोण त्याचा व्यासंग, यातून त्याचे एक वाङमय व्यक्तित्व तयार होत असते. त्यामूळे प्रत्येक लेखकाची स्वतःची एक निवेदनशैली व निवेदनाची भाषा निर्माण होत असते. याचा प्रत्यय पु.लं. देशपांडे याच्या या दोन्ही प्रवासवर्णनात दिसून येतो.

**१) कोकणी भाषेचा वापर.**

पु.लं. देशपांडे हे मराठी लेखक असल्यमुळे त्यांच्या लेखनाची भाषा मराठी असणे स्वाभाविक आहे. परंतू पु.ल. देशपांडे हे कोकणस्थ असल्याने बऱ्याच ठिकाणी कोकणी शब्द, वाक्याचा त्यांनी उपयोग केला आहे. उदा–

**अपूर्वाईः–**

१) 'वेली बीग फीत–वेली वेली बीग' (पृ–१०)

२) "किर्ते सांगूं तुका सायबा–हुमण म्हळयार अशें सुरभूस जाल्लें म्हण सांगू–" (पृ–२०१)

३) "इथे काळया–गोऱ्या लाल–पिवळ्या माणसांचे एक चालते बोलते खतखते शिजते आहे,"(पृ–२०८)

४) "आमचॉ मरेतूं –.... "तुं सुशेगात रावरे–"(पृ २३६)

**पूर्वरंगः–**

१) "मंगळूरकार तू! कोकणी उलैता? "(पृ–७७)

२) "निस्त्योचो रोस आनी आमली पॅज मॅळ्तली. हांगा पयसॉ हा–पण तॅ ना"! (पृ–७८)

३) "साहेब, अस्सल सांबर लेदर आहे,'किंवा' साहेब आनेष्टीबद्दल शंका नको. आस्सल मध

मंजी अस्सल मध! आपुन हनीमदी काकवी घालनारातले नाय – काय? ''(पृ–९४)

४) ''काय हो मुंबयवाले, एकटेच आलात की सहकुटुंब''(पृ–१००)

५) ''सारंगिये जसें अॅ–हांव सांगता तुका' (पृ–१०४)

६) ''कसलं हो, उगीऽऽचच हांकॉंगचं चायनीज डिनर घेऊन बसलांत ('तं–पूर्ण!)? आमच्या ब्याळगावशापुरचं एक साधं कोडंबाळ' सगळ्या चायनीज डिनरच्या तोंडात मारुन जात बघाऽऽ! ''(प'–१६८)

## २) परकीय भाषेचा वापर

**'अपूर्वाई'** मध्ये युरोपियन राष्ट्रातील प्रवास आहे. इंग्लंडमध्ये इंग्रजी फ्रान्समध्ये फ्रेंच, जर्मनमधीलं जर्मन भाषा वापरली जाते. त्यामुळे या वर्णनात त्या प्रदेशातील शब्दाचा त्यांनी अनेक ठिकाणी कलात्मक वापर केला आहे. प्रत्येक देशातील लोक दुसऱ्या भाषेचा वेगवेगळया पध्दतीने उच्चार करीत असल्यामुळे त्यांची भाषा कशी गंमतशीर होते हे त्यांनी अनेक उदाहरणांतून दाखवून दिले आहे. उदा–पुलं.नी 'गड मॉर्निंग' म्हटल्यानंतर इंग्लंड मधला बॉबी 'गुम्मॉग' म्हणतो. या प्रवासात पु.ल. देशपांडे या आडनावाचा युरोपियन लोकांनी अनेक पध्दतीने उच्चार केले. त्या बद्दल ते लिहितात ''ह्या प्रवासात मला देशपांडे अशी सरळ हाक मारणारा लंडनमधले महाराष्ट्र मंडळीचे सदस्य सोडून एकही महाभाग भेटला नाही. ढसपांद,डशपॅडी,डिशपॅडी, अशा आमच्या नावाच्या असंख्य चिंध्या झाल्या.– (प'–१०१) केंब्रिजमध्ये चर्च मधल्या प्रवचनाला 'सरवीस' असा शब्द आहे. भारतीय लोकही इंग्रजी शब्दांचे आपल्या पध्दतीने उच्चार करतात. त्यामूळे काय घोटाळे होतात. याचे उदा. देताना म्हटले आहे, ''दाक्षिणात्य उच्चारणे पध्दतीत 'बातरुमचे' 'भातरुम' होते तर वंगभूमीत कुण्या इंग्रजाने वंगबंन्धूला 'हॅपी न्यू इयर' म्हटल्यावर त्यांनी लगेच शेम टू यू'' म्हणून त्याला बुचकाळ्यात टाकल्याची एक 'कोथा' आहे''. (पृ–१६०) वडिलांच्या श्राध्दाच्या दिवशी रजा मागणारा भारतीय कारकून'' टू–मॉरो बीइंग माय मंडे आय शाल गो अर्ली फ्राम द हार्फीस'' अशा शब्दात बोलतो. (पृ. १६१) भाषेच्या बाबतीत पु. लं. नीच एके ठिकाणी परदेशी भाषा शिकणे आणि वापरणे किती अवघड असते. हे मार्मिकपणे सांगितले आहे. ते म्हणतात, ''फ्रेंच भाषा शिकणे हे मला तर भरतनाट्यम् शिकण्याइतके अवघड वाटले आणि फ्रेंच भाषा आल्याखेरीज पॅरीसमध्ये रहायचे म्हणजे चोंदल्या नाकाने सुगंध्याच्या दुकानात बसण्यापैकी

प्रकार होता. पॅरिसमध्ये सगळ्यांत पाहण्यासारखे काय असेल तर ही फ्रेंच भाषा! फ्रेंच मनुष्य होय म्हणायला 'उई' म्हणतो – नकळत सुई टोचल्या वर आपण एकदम 'उई' म्हणू तसे पण त्याचे नुसते एकदा 'हो' किंवा 'उई' म्हणून समाधान होत नाही. किमान पक्षी दहा वेळा 'उय् उय् उय् ' करावे तेव्हा एकदा 'होय' असे ठरते, आणि पंधरा वेळा 'नू नू नू नू' केल्याशिवाय 'नाही' हे सिध्द होत नाही. ही फ्रेंच माणसे बोलताना इतके हातवारे का करतात कोण जाणे! आपल्याकडे गोव्याच्या कोकणीत हा अविर्भाव "किर्ते सांगू तुका सायबा – हुमण म्हळ्यार अर्शे सुरभूस जाल्लें म्हण सांगू – " अशी सुरुवात करुन जेव्हा जातिवंत गोमंतकीय माशाच्या दाट कालवणाचे वर्णन सुरु करतो, तेव्हा त्याच्या त्या कोकणीला फ्रेंच भाषेचा स्वाद येतो. त्याचेही हात – भिवया – नाकडोळे तसेच उडतात. ही फ्रेंच माणसे खूप बोलतात ही भाषाच तशी आहे. ही माणसे आधीच भोगवादी – शब्ददेखील भोगतात." [६३] युरोपियन देशात प्रवास करताना इंग्रजी भाषेमूळे होणाऱ्या घोटाळ्याची ही वर्णने निर्मितीला ही कारणीभूत झालेली आहेत.

**'पूर्वरंग'** मध्ये पूर्वेकडील देशाचे वर्णन आहे. हे देश भारतीय संस्कृतीला जवळचे असल्याने या देशाचे वर्णन करताना त्यानी वेगळीच भाषाशैली वापरली आहे. भारतातून पूर्वेकडे बोटीने जाताना पु. लं. ची एका सरदारजीशी ओळख होते. आपण बुक लिहितो राइटर आहोत अशी माहिती पुरवतात. पण पुढे सरदारजी मित्र दुसऱ्या एका सरदाराला पु. लं. ची ओळख करुन देताना म्हणतो." यह बुक बायंडर का काम करता है।" (पृ. २६) मलाया या भाषेतील 'साला' या शब्दाबद्दल ही मजेशीर वर्णन केले आहे. त्या संदर्भात त्यांनी केलेले वर्णन हा भाषाशैलीचा एक नमुना आहे. त्यांनी म्हटले आहे, "मलाया भाषेत 'रॉग नंबर' असे टेलिफोनवर म्हणयचे असेल तर 'साला।' म्हणतात" हे ऐकून त्या भाषेच्या यथार्थ शब्दयोजना–सामर्थ्यावर माझे एकदम प्रेम बसले. 'ट्रिंग ट्रिंग' ऐसा 'खोटा नंबर' फिरल्यावर 'हॅलो हॅलो'ला 'साला' ह्यासारखे समर्पक उत्तर दुसरे मला तरी सुचत नाही! हे दुःख टेलिफोनशी घनिष्ठ संबंध असणाऱ्यांनाच कळावे. रात्री बाराएकच्या सुमारास गाढ निद्रेतून जागे करणारी ती क्षुद्र घंटिका! 'हॅलो' म्हणून आपण विचारतो आणि पलीकडून कुणीतरी 'केम सुख डमल सेठ' आशी प्रस्तावना करुन 'न्यूयोर्क कोटन' बद्दल अगत्य भाषेत बोलू लागतो. अशा वेळी साला! हा मलाय शब्द काय चपखल बसेल!" [६४] असेच एक वर्णन इंडोनेशियाच्या संदर्भात केले आहे. इंडोनेशियान मुस्लिम संस्कृतीचा प्रभाव असून ही हिंदू धर्माच्या

संस्कृत भाषेचाही प्रभाव आहे हे सांगताना त्यांनी दिलेली नावे मजेशीर आहेत. "उदा. – 'नकुल केमिस्ट', 'दिर्घायू बॅंक', 'धर्मनिर्मला हॉटेल', 'पुलिस आश्रम', इ. इंडोनेशियात त्यांना एक गणेशमूर्ती आवडली त्याचे नाव सांगताना विक्रेता म्हणतो 'धिस इज पिकॅसो गणेशा'! जपानमध्ये चहाला 'चा' म्हणतात त्याचे त्यानी केलेले वर्णन हा एक भाषाशैलीचा नमूना होय. त्यानी लिहिले आहे, "जपानीत चहाला 'चा' म्हणतात. दुधाचा आणि बिनदुधाचा ह्याला अनुक्रते 'ओचा' आणि 'कोचा' म्हणतात. महिनाभर जपानात राहूनही 'ओचा' म्हणजे दुधाचा की 'कोचा' म्हणजे दुधाचा हे योग्य वेळी मला कधीही आठवले नाही. त्यामुळे जपानी चहाने दरवेळी माझा कोचाच केला! नुसतेच 'टी' म्हणावे तर तो जपानी हिरव्या पातीच चहात्मक काढा येत असे."[६५]

अशा प्रकारे पाश्चात्य आणि पौर्वात्य देशात प्रवास करताना भाषेतील घोटाळे कसे होतात. हे त्यांनी दाखवून दिले आहे.

### ३) परकीय कल्पनांचे मराठीकरण :

या दोन्ही प्रवासवर्णन पुस्तकांत त्यांनी पाश्चात्य व पौर्वात्य देशांतील काही वस्तू, रुढी, परंपरा, यांना भारतीय पध्दतीने नावे दिली आहेत. एका दृष्टीने परदेशी कल्पनांचे त्यांनी मराठीपण केले आहे. असे काही वैशिष्टपूर्ण शब्द या दोन्ही पुस्तकांत आढळतात. त्यामुळे वर्णनाच्या निवेदन पध्दतीतील भाषा वैशिष्ट्यपूर्ण झाली आहे.

'अपूर्वाई'मध्ये असलेले शब्द – 'शय्या पेय', (ब्रेड टी) 'भुयारी रेल्वे–मेट्रो', 'आश्यम सुंदरी', 'फ्रेंच माणूस एक सुरी आहे', (रामाप्रमाणे एक वचनी), निशागृहे (नाईट क्लब), गरीब बिचारा माधुकरी म्हणून केलेली बोळवण, 'मॅक्केज' (हॉटेल).

### पूर्वरंगमधील उदाहरणे

'लंकेत हल्ली सोन्याच्या विटा नाहीत', 'सिंहवली भाषेत नाराळाला 'कोकोनट' म्हणतात. 'सुख भूमिकडे जाणारा रस्ता', 'गजगुहा', 'भूगोल शास्त्राची आमची विकेट, त्या विमानतळावरच उडाली होती.' 'लिंगायताच्या गळ्यातील शिवलिंग, फकीरा चा ट्रेझिस्टर', 'चहा पान मंदिर', 'चहा पंडीत', 'चहा पंडितासारखे पुष्पपंडीत' ही इथे होऊन गेले.

अशा प्रकारे भिन्न भिन्न संस्कृतीतले विशेष त्यांनी नोंदविले आहेत. त्यातून त्यांच्या भाषाशैलीचे गुणधर्म व्यक्त होतात.

## ४) नाट्य व संगीत क्षेत्रातील परिभाषा

पु. लं. देशपांडे यांना संगीताचे वेड अधिक त्यांनी स्वतःच म्हटले आहे, "मला स्वतःला रंगापेक्षा स्वराचा ओढा अधिक आहे." (पृ. १०८) त्यामुळे वर्णन करताना त्यांनी संगीताची परिभाषा वापरल्याने भाषेत एक वेगळेपण जाणवते. तसेच त्यांना संगीत नाटकाची सुध्दा ओढ अधिक आहे. त्यामुळे नाट्यगीतावर त्यांचे प्रेम अधिक आहे. त्यामुळे त्यांनी लेखनात नाट्यगीतांचाही वापर केला आहे. संगीत आणि संगीतनाटके यांचा प्रभाव त्यांच्या भाषा शैलीवर आढळतो.

**अपूर्वाई**

१. इजिप्तमध्ये सुवेझ कालवा प्रकरणामुळे युध्दाची तयारी चालली होती. त्याचे वर्णन करताना त्यानी म्हटले आहे, "नाटकाला केव्हा आणि कोण सुरुवात करणार होते ते ती 'समरी विहरत' असणारी माताच जाणे!' देशोदेशीचे धैर्यधर रंगून तयार होतो.' 'धनी मी पती वरिन कशी अधना' म्हणणाऱ्या भामिनीच्या एंट्रीचीच काय ती उणीव होती" [६६]

२. कस्टम्स अधिकारी त्यांच्या बॅगा तपासतात त्या प्रसंगी 'त्या अधिकाऱ्याने माझ्याकडे अत्यंत सहानुभूतीने पाहून 'वत्सा तुजप्रत कल्याण असो' म्हणत बॅगांवर खडूची फुली मारली.' (पृ. ५५)

३. पिटलॉक्रीमध्ये एका हॉटेलात त्यांनी "पिआनों'वर चक्क 'वद जावू कोणाला शरण बडवायला' सुरुवात केली." (पृ. ९४)

४. ऑक्सफर्डमध्ये तरुण तरुणी कशा वागतात याचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे. "बाकी पाश्चात्य देशांतले हे 'अहो येता जाता, उठत बसता, कार्य करता' दिसणारे व 'समस्तांची लज्जत त्यजूनि चालणारे प्रेमाराधन पाहून सुरुवातीला डोके गरगरायला लागते हे खरे... पाश्चात्य तरुणीला तरुण दिसला की, 'चंद्रीका ही जणू" [६७]

५. पाश्चात्य देशातील चर्चमध्ये प्रार्थना शांतपणे म्हटली जाते. हे पाहल्यावर त्यांना आपल्याकडील भजनाची आठवण होते. म्हणून ते म्हणतात, "आमचे भजन म्हणजे आकाश भेदून देवाच्या कानी पोचते. 'ब्रम्हानंदी लागली टाळी तेथे कोण देहाते सांभाळी?' हा आमच्या भजनाचा थाट" (पृ. १५६)

६. "हॅम्लेट पाहताना तर माझी 'अश्रुनीर वाहे डोळा' अशी अवस्था झाली." (पृ. १७४)

७. आजच्या रंगभूमीचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे. "ही रंगभूमी मोठी खट्याळ आहे. प्रत्येक काळात ती नव्या नव्या प्रियकरांना जवळ करते! सध्या तिने नट, नाटककार, गायक, वादक वगैरे आपले सगळे जुने प्रियकर सोडले आहेत आणि तिचा रंगारी, बत्तीवाले आणि आयुष्यात तोंडाला रंग न लावलेले आणि नाटक पाहण्यासाठी जाग्रणसुध्दा न पेलणारे टीकाकार ह्यांच्याशी लडिवाळपणा चालला आहे." (पृ. १७९)

८. "इंग्रजांच्या बेतशुध्द पाहुणचारापुढे तुलनेने हे जर्मन अगत्य भलतेच आकर्षण वाटले. वास्तविक त्या हॉटेलात आम्ही पैसे देऊन राहत, जेवत होतो. परंतु 'काय हवे, काय नको' ते काळजीने पाहण्याचा प्रकार इंग्लंडात जवळ जवळ आढळला नाही." (पृ. १९४)

९. "हिंदुस्थानात पाठवायचा कार्डाला आणखी किती तिकिटे लावायची हा प्रश्न त्या कार्डावर बोटांनी 'इथे इथे नाच रे मोरा' करीत त्या कारकुनाला मी केला." (पृ. २१४)

१०. "माझ्या पलीकडला तो गोरा कोचरेकर मास्तर तर विमानाच्या इंजिनाच्या स्वराशी सुसंवादी स्वर काढून चांगला तोंड उघडे टाकून 'षड्जगंधार' भावात घोरत होता." (पृ. ४३)

**पूर्वरंग**मध्ये ही नाट्य व संगीत क्षेत्रातील परिभाषा त्यांनी वापरली आहे. उदा.

१. जकार्तातील एका थिएटरात ते नाटक पाह्यला गेले असताना सुरुवातीला त्यांना भयानक संगीत ऐकावे लागले. त्याचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे, "....तीस पस्तीस लोकांचा वाद्यमेळ समोर मोदक पात्रांसारखी भांडी घेऊन गटागटाने त्याच्यावर लाकडी हातोड्याने घन मारीत तिलंग रागासारखी सुरावट बदडीत होता. खर्ज, मंद्र आणि तार सप्तकांत देवळातल्या घंटा आलटूनपालटून वाजत रहाव्यात तसे ते सूर ऐकू येत होते." (पृ. ७९)

२. इंडोनेशियातील एका चित्रप्रदर्शनात एक चित्र होते त्याचे वर्णन करताना ते म्हणतात, "अर्जुनाच्या शरसंधानापेक्षा त्या रुपवत्तीचे शरसंधान अधिक घायाळ करणारे होते, सुकान्त चंद्रानना पातली भ्रूधनु सरसावुनि' असे मी गुणगुणायला लागलो. (पृ. ८६)

३. "क्षणार्धात मीदेखील त्या गर्दीत वाजणाऱ्या ढोलाच्या तालावर 'घेवा तुझी सोहोन्यांची जेहेजुरी' म्हणू लागलो." (पृ. १००)

४. "मी माझ्या पत्नीला म्हटले आहे. आपणही यांना 'गोमु चल जाउ गो चौपटी बंदराला' करुन दाखवू (पृ. १८८)

५. एका ज्वालामुखीवरुन विमान जाताना वाटलेल्या भितीचे वर्णन करताना त्यांनी म्हटले आहे, "मी माझ्या मनाला म्हटले, 'नाऱ्या शुभ बोल' पण मनाला समर्थानी 'सज्जना' म्हणून हाक मारुन ते वळले नाहीत. त्यांनादेखील 'अचपळ मन माझे नावरे आवरीता' म्हणावे लागले." (पृ. १२३)

६. "अजूनि चालतोचि वाट–घाण ही सरेना" म्हणत म्हणत मध्यरात्री जकार्ता स्टेशनवर उतरलो." (पृ. १३३)

७. "आमच्या भोवती सयामी मंडळीचा हा हा म्हणता घोळका जमला' पुंडलीक वरदा हारि विठ्ठल' करुन मी भजनी लोकांच्या थाटात बाप रखुमादेवीवराया लाडक्या लेकाचा अभंग सुरु केला.' 'अवघाचि संसार सुखाचा करीन–आनंद भरीन तीन्ही लोक!" [६९]

८. "मधूनच एखाद्या सुंदर स्वरसंगतीत तिसऱ्याच वाद्याची बेसूर हरकत निघून जावी तशी ती जपानी सोजिरांनी चिनी पोरांना आपटण्यासाठी वापरलेली हांगॅकॉगमधली तिमजली इमारत दिसत होती." [७०]

९. इंडोनेशिमध्ये महाभारताचे नाटक पाहताना त्यातील पात्रे कशी बोलत होती. हे सांगताना त्यांनी म्हटले आहे, "तिचा द्रोपती तार स्वर धर्मराज्य मध्ये स्वप्तकात आणि भीम खर्जात" (पृ. ८३)

अशा प्रकारे पु. लं. देशपांडे यांनी प्रवासवर्णननाच्या निवेदनात मराठी संगीत नाटकातील अभंगातील वाक्यांचा उपयोग करुन निवेदन आकर्षक बनविण्याचा प्रयत्न केला आहे.

### ५) संस्कृत भाषेचा समर्पक उपयोग

प्रवासातील अनुभवाचे निवेदन करताना पु. लं. देशपांडे यांनी काही वेळेला संस्कृत वाक्यांचा, सुभाषितांचा समर्पक उपयोग केला आहे. त्यामुळेही त्यांच्या निवेदनातील भाषाशैली उठावदार झाली आहे. उदा.

**अपूर्वाई :**

१. 'कालाय तस्मै नमः' (पृ. १०५)

२. 'एष धर्मः सनातन' (पृ.११५)

३. ''भावस्थिराणि जनना नारसौहृदानि'' (पृ.१९८)

४. ''क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशान्ति'' (पृ.२३७)

५. ''सीदन्ति मग गात्राणि'' (पृ.२४९)

**पूर्वरंग :**

१. पर्युत्सुकीभवति यत्सुखिनोऽपि जन्तु' (पृ.४५)

२. 'त्वमेव माता च पिता त्वमेव' (पृ.४८)

३. 'शैलेंद्र सर्वारिमदमंथन जयभूपती जयमानहेन विष्णुमूर्ती समरविदव सकल भुवनमंडलेश्वरानिंदित हरो गोवर्धन विक्रोणोत्तुंगदेव' (पृ.७१)

४. 'शुभं करोति कल्याणम्' (पृ.८९)

५. 'अहिंसा परमो धर्मः' (पृ.१६९)

६. 'अष्टपुत्रा सौभाग्यवती भव' (पृ.१७१)

७. 'यत्तपस्यसि कौन्तेय तत्कुरुष्व मदर्पणम्' (पृ.१९३)

८. 'ना विष्णुः पृथिवीपति' (पृ.२१९)

९. 'बुध्द शरणं गच्छामि' (पृ.२४३)

अशा प्रकारे या दोन्ही प्रवासवर्णनपर पुस्तकात कोकणी भाषेचा, परकीय भाषेचा, संस्कृत भाषेचा उपयोग केल्याने त्यांचे लेखन वैशिष्ट्य पूर्ण ठरली आहे.

### इ) प्रवासवर्णनातील चित्रमयता.

पु. ल. देशपांडे यांच्या या दोन्ही प्रवासवर्णनातून आपणास त्यांच्या चित्रमयशैलीचा प्रत्यय येतो. एखादी व्यक्ती एखादा प्रसंग, एखादे दृश्य, एखादी वास्तु, एखादी वस्तु, यांचे वर्णन करताना ते वाचकांसमोर त्याचे साक्षात चित्र उभे करतात. ही चित्रे त्यांनी कधी स्वतःच्या शब्दांतून तर कधी शि. द. फडणीस यांच्या रेषांतून रेखाटली आहेत. त्यामुळे चित्रमयता हा त्यांच्या या दोन्ही प्रवासवर्णनाचा एक विशेष होय.

**'अपूर्वाई'** मध्ये अनेक ठिकाणी ही चित्रमयता आढळते. प्रारंभी प्रवासाची पूर्वतयारी

करताना सूट–बूट, इतर कपडे, विमानाची तिकिटे, पासपोर्ट तयार करताना आपली कशी धांदल उडाली याची त्यांनी केलेली वर्णन चित्रमय आहे. विमानाने उड्डाण केल्यानंतर रात्रीच्या वेळेला दिसणाऱ्या मुंबईचे आणि विमानातील प्रवाशाचे वर्णन ही पाहण्यासारखी आहे. लंडनच्या शहरात प्रवेश करतात सकाळच्या वेळी आढळणाऱ्या शांततेचे वर्णन ही असेच आहेत.(पृ.५६) बॉबीचे त्यांनी केलेले वर्णन तर शब्दचित्राचा रम्य अविष्कार आहे. (पृ.६१) इंग्लंडमधील भुयारी रेल्वे आणि रेल्वे स्टेशन याचे वर्णन, (पृ.६६) इंग्लंडमधील स्त्रीयांचा चपळपणा त्यांची प्रसाधनाची आवड यांची त्यांनी वास्तवचित्रे टिपली आहेत. (पृ.७५) इंग्लंडमधील रेल्वे पाहाताना त्यांना भारतीय रेल्वे स्टेशनचे आठवण होते. भारतीय रेल्वे स्टेशन मधील विविध संवादाचे त्यांनी केलेले वर्णन आपल्या नजरेसमोर भारतीय रेल्वे स्टेशनचे हुबेहुब चित्र उभे राहते.(पृ.८६) स्कॉटलंडमध्ये संध्याकाळच्या वेळी एका वादकाचे बॅगपाईप वाद्याच्याचे स्वर असे भारावून टाकत होते. त्याचे वर्णन जणू स्वरचित्र होय. (पृ. ९७) रदरफोर्ड या नटाच्या नाट्य वेड्याचे रेखाटलेले चित्रे कमालीचे बोलके आहे. (पृ. १२०) कार्लाइलच्या घराचे (पृ.१३२,१३३,१३४) तसेच शेक्सपिअरच्या घराचे व समाधीचे (पृ. १७२,१७३) केलेली वर्णने चित्रमय आहे. इंग्लंडमधील बालनाट्य पाहताना बालप्रेक्षकांचे केलेले वर्णन भावपूर्ण आहे. (पृ. १६७) पॅरीसमधल्या आयफेल टॉवरचे (२१०) पॅरीसमधील नाईट क्लब (पृ. २१५, २१६) फ्रेंच माणसाच्या जेवणसबंधीचे (पृ. २१२,२१३) इंग्लंडहून भारताला घडलेले दर्शन (पृ. २४३) अशीच चित्रमय आहेत.

**'पूर्वरंग'**मध्ये ही अशीच चित्रमयता आढळते. पूर्वेकडच्या प्रवासाला जाताना इंजेक्शन टोचून घेण्यासाठी हॉस्पिटलमध्ये गेल्यानंतर तेथील वातावरणाचे त्यांनी मिष्किल वर्णन केले आहे. (पृ. १२) इटाली जहाजावर 'शेवई' पदार्थ खाण्यातील गंमत (पृ. २३) सुरेखपणे रेखाटली आहे. मलायाच्या राजेसाहेबाचे कोलंबो बंदरात स्वागतकरण्यासाठी सरकारी नोकराची जी धांदल चालली होती. तीचे वर्णन मिष्कील आहे. (पृ.३२) सिंगापूर शहर स्वच्छ असतानाही 'चायना टाऊन' या चिनी लोकांच्या वसाहती किती गलिच्छ होत्या त्याचे त्यांनी घडविलेले दर्शन अर्थपूर्ण आहे. (पृ.४९) जकार्तामधील एका थिएटरात नाट्यसंगीताचा कार्यक्रम पाहताना संगीताचा आलेला भयानक अनुभव तेथील नटांनी महाभारतातील केलेली भूमिका याचे पु. लं. नी विनोदी पध्दतीने केलेली वर्णन ही अर्थपूर्ण आहे. (पृ. ७९ ते ८५) बाली बेटावर एके ठिकाणी बाली युवतीचे त्यांनी

पाहिलेले नृत्य (पृ. १०३, १०४)अजंठ्याच्या लेण्याची आठवण करुन देते. बॅंकॉक च्या तरंगत्या बाजाराचे(पृ.१४०, १४१) वर्णन ही पाहाण्यासारखे आहे. विशेषतः पूर्वेकडील या प्रवासात निरनिराळ्या देशातील बुध्दमंदिरातील बुध्दाच्या भव्य मूर्ती मंदिरातील शांतता व स्वच्छता याची त्यांनी अनेक सुंदर शब्दचित्रे रेखाटली आहे. चिनी शिंप्याचे त्यांनी रेखाटलेले व्यक्तिचित्र मार्मिक आहे. (पृ. १६६) पूर्वेकडील या देशात प्रामुख्याने त्यांना चिनी व जपानी समाजाचे लोक दिसले चिन्याचा गलिच्छपणा चेहऱ्यावरील गूढता त्याची उध्दमशीलता तसेच जपानी लोकांचे उध्दमशीलता आदरातिथ्यपणा, रंगेल असून ही त्यांची प्रखर धर्मश्रध्दा, त्याची निसर्गवेड, हे त्यांनी वेगवेगळ्या प्रसंगातून चांगल्या प्रकारे टिपले आहे. जपानी 'पंखा' (२६३) आणि जपानी 'गेयशा' याची वैशिष्ट्ये त्यांनी मार्मिक शब्दात टिपली आहेत. (पृ. २५१,२५३,२६३) जपानमध्ये नाट्यप्रयोगाच्या अगोदर वेगवेगळ्या कंपन्याच्या जाहिराती नाट्यरुपाने सादर केल्या जातात. त्यातील नाविन्य त्यांनी टिपले आहे. (पृ. २२७) जपानमधील लाकडी घराचे वर्णन ही त्यांनी चांगले केले आहे. जपानमध्ये त्यांना एक अमेरिकन प्रवाशी भेटला त्याचे त्यांनी रेखाटलेले शब्दचित्र हृदयाचा ठाव घेणारी आहे. (पृ. २७८, २८२)

अशा प्रकारे या दोन्ही प्रवासवर्णनात त्यांनी चित्रमय शैलीचा वापर केलेला दिसून येतो.

## प्रकरण तिसरे

## संदर्भ – सूची


१. वसंत सावंत, **प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार**, पृथमावृत्ती मुंबई, १९८७. पृ. ८५.

२. तत्रैव पृ. ८६

३. भालचंद्र फडके (संपा.) **महाराष्ट्र साहित्य पत्रिका अंक.** क्र. १९० व १९१ (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ५

४. वसंत सावंत, **प्रवासवर्णन : एक वाङ्मयप्रकार**, पृथमावृत्ती मुंबई, १९८७. पृ. ३२४,३२५.

५. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ.१४०,१४१.

६. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. १२५.

७. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. ३४,

८. तत्रैव पृ. १६७.

९. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. १८८.

१०. भालचंद्र फडके (संपा.) **महाराष्ट्र साहित्य पत्रिका** अंक. क्र. १९० व १९१ (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ३.

११. तत्रैव पृ. ३

१२. आनंद यादव, गप्पातून गवसलेले पु. लं. **महाराष्ट्र साहित्य पत्रिका** अंक १९०–१९१ (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ३.

१३. भीमराव कुलकर्णी, पुरुषोत्तम स्वामी **गु सा ई महाराष्ट्र साहित्य पत्रिका** अकं क्र. १९०, १९१. (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ६३.

१४. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. ७४ ते ७६.

१५. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. १०१.

१६. भीमराव कुलकर्णी, पुरुषोत्तम स्वामी **गु सा ई महाराष्ट्र साहित्य पत्रिका** अकं क्र. १९०, १९१. (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ६५.

१७. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. ६५.

१८. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. ४१.

१९. तत्रैव पृ. ७७.

२०. आनंद यादव गप्पातून गवसलेले पु. लं., **महाराष्ट्र साहित्य पत्रिका** अंक १९०–१९१ (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ३२,३३.

२१. भीमराव कुलकर्णी , पुरुषोत्तम स्वामी **गु सा ई महाराष्ट्र साहित्य पत्रिका** अकं क्र. १९०, १९१. (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ६३.
२२. आनंद यादव, गप्पातून गवसलेले पु. लं. **महाराष्ट्र साहित्य पत्रिका** अंक क्र. १९०–१९१ (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ३२.
२३. आनंद यादव, गप्पातून गवसलेले पु. लं. **महाराष्ट्र साहित्य पत्रिका** अंक १९०–१९१ (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ३२,३३.
२४. भीमराव कुलकर्णी (संपा.) **प्रदक्षिणा खंड एक.** आवृत्ती सातवी पुणे. ३०. पृ. ३९९.
२५. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. १३.
२६. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. १६५, १६६.
२७. तत्रैव पृ. १८५.
२८. आनंद यादव, गप्पातून गवसलेले पु. लं. **महाराष्ट्र साहित्य पत्रिका** अंक १९०–१९१ (जूलै – डिसेंबर १९७४) पृ. ३०.
२९. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. ७८.
३०. तत्रैव पृ. ९६, ९७.
३१. तत्रैव पृ. १७२, १७३
३२. तत्रैव पृ. १८९.
३३. देशपांडे पु. ल., **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. ९१.
३४. तत्रैव पृ.१८८.
३५. तत्रैव पृ. २६३.
३६. उषा कुलकर्णी, निशा पाटील, **विनोद वाङ्मय प्रकार : आकलन आणि रसस्वाद**, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रथमावृत्ती नाशिक १९९३ पृ. ३.
३७. तत्रैव पृ. ४.
३८. तत्रैव पृ. ४.
३९. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. ११, १२.
४०. तत्रैव पृ. १८७.
४१. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. ३२.
४२. तत्रैव पृ. २६९.
४३. तत्रैव पृ. २७१.

४४. तत्रैव पृ. २७२.

४५. उषा कुलकर्णी, निशा पाटील, **विनोद वाङ्मय प्रकार : आकलन आणि रसस्वाद**, यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ प्रथमावृत्ती नाशिक १९९३ पृ. ४.

४६. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. २४.

४७. तत्रैव पृ. २०३.

४८. तत्रैव पृ. २२३, २२४.

४९. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. ६६.

५०. तत्रैव पृ. १६५, १६६.

५१. तत्रैव पृ. २३८ ते २४०.

५२. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. ४६.

५३. तत्रैव पृ. ८४, ८५.

५४. तत्रैव पृ. ९७.

५५. तत्रैव पृ. १७२, १७३.

५६. तत्रैव पृ. १८५, १८६.

५७. तत्रैव पृ. २३४.

५८. तत्रैव पृ. २४१.

५९. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ.७७, ७८.

६०. तत्रैव पृ. ९१.

६१. तत्रैव पृ. १८८.

६२. तत्रैव पृ. २०३.

६३. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. २०१.

६४. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. ५४.

६५. तत्रैव पृ. १८५.

६६. पु. ल. देशपांडे, **अपूर्वाई**, आवृत्ती सोळावी पुणे, १९९९, पृ. ४८.

६७. तत्रैव पृ. १४९.

६८. पु. ल. देशपांडे, **पूर्वरंग**, आवृत्ती अकरावी पुणे, १९९८, पृ. ७९.

६९. तत्रैव पृ. १५७.

७०. तत्रैव पृ. १८१.